

श्री गुरुनानक देवजी

यांना जयंती निमित्त

विनम्र कोटी कोटी अभिवादन !

समाजसेवक

मा.श्री. अविनाश देडगांवकर

अ.नगर समाजरत्न पुरस्कारप्राप्त

अहिल्यानगर





नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २४.११.२०२६ | अंक नं. १९७ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020





मा.राजुमामा जाधव



मा.विलास लांडगे









मा.प्रा.राम शिंदे
सभापती



मा. पै.सुभाष लोंढे
नगरसेवक, मनपा



मा. नितीन कुंकूलोळ
उद्योजक





मा.खा. डॉ.सुजय दादा विखे पाटील

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छूक -

पै.वैभव विलास लांडगे अध्यक्ष-अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ

मा.तुषार अंबाडे

पै.छबुराव लांडगे तालीम सर्जेपुरा, अहिल्यानगर





जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

नवा मराठा

फोन - २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९६६६६६६

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

दुष्काळात पाण्याचा थेंब न थेंब महत्त्वाचा असताना पाण्याची नासाडी करणाऱ्या 'त्या' ठेकेदारावर कारवाई करणार कोण?

नगर – एकीकडे दुष्काळाची तीव्र दहाकता जाणवत असून दुसरीकडे अहिल्यानगर शहरांमध्ये पाण्याचा अशी नासाडी सुरू आहे. ठेकेदाराने बनवलेला नवीन सिमेंट डिव्हायडरवर पाणी जरी माराव लागत असले तरी ते किती प्रमाणात मारावे आणि कशा स्वरूपात मारावे याचे काही मूल्य ठरवलेली किंवा ठरलेली असावेत. दुष्काळात पाण्याचा थेंब ना थेंब अति महत्त्वाचा होत चालला आहे. अशा परिस्थितीत आपल्या महानगरपालिकेने अनेक जणांना नळाचे पाणी वाया जाते म्हणून नोटीसा बजावत दंड थोटावला आहे. तर दुसरीकडे मात्र प्रशासनाने नेमलेलेच ठेकेदार एखाद्या ठिकाणी जशी ढगफुटी होते तशा तऱ्हेने जर पाण्याचा वापर करीत असतील तर नक्कीच ज्यांना 'जनाची नाही तर मनाची देखील नसेल' अशा लोकांमुळे दुष्काळात शहरावर पाणीटंचाईची छाया अधिकच गडद होत जाईल.



छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर महामार्गावर शासकीय विश्राम गृह तर कलेक्टर ऑफिस दरम्यान विना नंबरच्या पाण्याचा टँकरद्वारे सुरु असलेली पाण्याची नासाडी. (छायाचित्र : अमित मण्यार)

छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर महामार्गावर शासकीय विश्रामगृह तर कलेक्टर ऑफिस दरम्यान विना नंबरचा पाण्याचा टँकर दिवसाढवळ्या राजरोसपणे नवीन बनवलेला डिव्हाइडवर पाण्याची कशी नासाडी करत आहे या फोटोतून दिसून येत आहे. जिल्हाधिकारी यांनी अशा ठेकेदारांना पाण्याचा थेंब न थेंब किती महत्त्वाचा आहे हे दाखवून दिले पाहिजे.

अशा ठेकेदारांना काम न दिलेलेच बरे कारण असे ठेकेदार ज्यांना दुष्काळात पाण्याची मोल काय आहे हे जर समजत नसेल तर ते शासकीय कामाच्या लायकीचे नाहीत. असे म्हटले तर काही वावगे ठरणार नाही. डिव्हायडर वर प्रमाणापेक्षा पाणी मारून ते वाया घालवण्यापेक्षा या टँकर मधील उर्वरित पाणी एखाद्या खेडेगावातील मुक्या जनावरांची, पशुपक्षांची तहान भागवेल हे या पाण्याची नासाडी करणाऱ्या ठेकेदाराला कोण सांगणार ? असा सवाल उपस्थित होत आहे.

गोमांस विक्री करताना एकाला पकडले

६० किलो गोमांससह १९ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त

नगर – शहरातील मुकुंदनगर भागातील बजाज कॉलनी येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय जनावरांच्या मांसाची विक्री करणाऱ्यावर भिंगार कॅम्प पोलिसांनी छापा टाकून ६० किलो गोमांस सह १९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एका इसमास ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कॅम्प पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार २२ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास मुकुंदनगर बीट हद्दीत पेट्रोलिंग करत असताना बजाज कॉलनीतील पत्र्याच्या शेडमध्ये एक इसम गोमांस विक्री करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सकाळी ११.२० वाजता त्या ठिकाणी छापा टाकला. चौकशीत ताब्यात घेतलेल्या इसमाने आपले नाव वसीम मोहम्मद कुरेशी (वय ३२ वर्षे, रा. सदर बाजार, भिंगार) असल्याचे सांगितले. त्याने सदर गोमांस सदर बाजार, भिंगार येथून विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली.

छाप्यादरम्यान घटनास्थळावरून १८ हजार रुपये किमतीचे अंदाजे ६० किलो गोमांस तसेच १ हजार रुपये किमतीचा एक लोखंडी सत्तूर आणि लोखंडी वजन काटा असा एकूण १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पो.कॉ.कैलास शिरसाठ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात बीएनएस कलम २७१, ३२५ सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारणा २०१५) च्या कलम ५(सी) व ९(ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोटरसायकलची चोरी

नगर – शहरातील स्टेशन रोडवरील मल्हार चौक परिसरातून हिरो कंपनीची एचएफ डिलक्स मोटरसायकल (क्र. एमएच १६ सीएच ५०८१) अज्ञात इसमाने चोरून नेल्याची घटना १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सागर भानुदास देवतरसे (वय ३८ वर्षे, रा. मु. पो. दहिगाव, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

लॉनच्या पार्किंगमधून मोपेडची चोरी; गुन्हा दाखल

नगर – शहरातील मनमाड रोडवरील संजोग लॉनच्या पार्किंगमध्ये हँडल लॉक करून ठेवलेली होंडा कंपनीची ॲक्टीव्हा मोपेड (क्र.एमएच १६ बीटी ४३३३) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १९ नोव्हेंबर रोजी रात्री ८.१५ ते रात्री १०वाजण्याच्या दरम्यान घडली आहे.

याबाबत शिक्षिका असलेल्या स्नेहा रवी भालशंकर (वय २४ वर्षे, रा. शाहूनगर, केडगाव, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून २१ नोव्हेंबर रोजी रात्री तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरात विद्युत खांब अन् मीटर डीपी धोकादायक अवस्थेत; 'महावितरण'चे अधिकारी दुर्घटनेची वाट पाहत आहेत का?

अनेक दिवसांपासून दुरुस्तीकडे दुर्लक्ष; महिला, लहान मुले आणि नागरिकांच्या जीवाला धोका : तातडीने कार्यवाहीची मागणी

नगर – रेल्वे स्टेशन परिसरातील इंगळे वस्ती येथे गेल्या अनेक दिवसांपासून महावितरणाचा विद्युत खांब वाकलेल्या अवस्थेत असून, मीटरची डीपीदेखील खाली पडलेल्या स्थितीत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. विशेषतः या भागात महिला, लहान मुले आणि नागरिकांची सतत वर्दळ असते. अशा परिस्थितीत एखादी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या समस्येबाबत परिसरातील नागरिकांनी नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे व माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांच्याकडे तक्रार केली होती. नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत पौर्णिमा व विजय गव्हाळे यांनी महावितरणच्या वायरमनसह संबंधित अधिकाऱ्यांना या धोकादायक परिस्थितीची माहिती देऊन तातडीने विद्युत खांब आणि मीटर डीपीची दुरुस्ती करण्याच्या सूचना केल्या आहेत. मात्र, अनेक दिवस उलटूनही महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वाकलेला विद्युत खांब आणि खाली पडलेली मीटर डीपी यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसाळा असो किंवा वाऱ्याचा जोर, अशा धोकादायक विद्युत यंत्रणेमुळे मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांना सतावत आहे.



नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही महावितरण प्रशासनाला जाग येत नसेल, तर एखादी जीवितहानी झाल्यानंतरच अधिकारी व कर्मचाऱ्यांना जाग येणार का? असा संतप्त प्रश्न उपस्थित होत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता महावितरणने केवळ तक्रारीची दखल घेण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

इंगळे वस्तीतील नागरिकांच्या जीविताशी खेळ न करता महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने वाकलेल्या विद्युत खांबाची आणि खाली पडलेल्या मीटर डीपीची सुरक्षित दुरुस्ती करावी व परिसरात लोम्बकलेल्या तारा तेदेखील ओढून घ्याव्या अशी मागणी विजय गव्हाळे यांनी केली आहे.

श्रीमती सुरजबाई कोठारी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – श्रीमती सुरजबाई पोपटलाल कोठारी (वय ९३) यांचे २४ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कानोर, ता.पारनेर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, १ मुलगी, २ जावई, नातवंडे असा परिवार आहे. संतोष, दीपक, राणी यांच्या मातोश्री तर रविंद्र बलई यांच्या त्या सासू होत.

लताबाई सपकाळ यांचे दु:खद निधन



भिंगार – गवळीवाडा येथील रहिवासी लताबाई चंद्रभान सपकाळ (वय ७३) यांचे २३ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई, दीर, भावजया, पुतणे, पुतण्या असा परिवार आहे.

सौ. ललीताबाई भद्रे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी सौ. ललीताबाई चंद्रभान भद्रे (वय ६७) यांचे २३ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चंद्रभान भद्रे यांच्या पत्नी तर डॉ. राहूल, डॉ. पल्लवी यांच्या त्या मातोश्री होत.

अरुण करीर यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील स्टेट बँक चौकातील शक्ती बॅटरी चे मालक अरुण रामनिरंजनदास करीर (वय ७८) यांचे अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक बहिण, दोन मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कौशल व अजित करीर यांचे थोरले बंधू, विशाल व आनंद करीर यांचे वडील, अनुप धुस्सा यांचे सासरे होत.

पंढरीनाथ लांडगे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – तालुक्यातील देहरे येथील शेतकरी पंढरीनाथ सबाजी लांडगे (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, दोन मुले, सुना, नातू, नात असा परिवार आहे. शेतकरी अनिल लांडगे यांचे ते वडील होत.

रावसाहेब झरेकर यांचे दु:खद निधन



नगर – हिवरेझरे येथील रहिवासी रावसाहेब जयवंत झरेकर (वय ८४) यांचे २३ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर हिवरेझरे येथील राहत्या घराजवळ अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ भाऊ, २ बहिणी, २ मुले, सुना, ४ नातवंडे असा परिवार आहे. सुभाष झरेकर, बाबासाहेब झरेकर, मुलगी छाया यांचे वडील, रत्नापूरचे सरपंच दादा वारे, माजी जि.प. सदस्य दत्ता वारे यांचे मेव्हणे तर सारोळा कासारच्या कडूस कुटुंबाचे जावई होत.

शेखर पाठक यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील पूर्वीचे पाठक क्लासेसचे संचालक शेखर भरत पाठक (वय ६७) यांचे अल्प आजाराने दु:खद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर न.प. बचत गटाच्या समूह संघटीका अधिकारी सौ.वर्षा पाठक यांचे पती, बँक ऑफ बडोदाचे वसुली अधिकारी चि.शंतनू पाठक यांचे वडील होत.

पाईपलाईन रोडवरील नगरसेवकासह ३ ठिकाणी घरफोड्या करणारा आरोपी जेरबंद

आरोपीकडून ३ लाख ८० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त

नगर – अहिल्यानगर शहरातील पाईपलाईन रोड परिसरात झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा तोफखाना पोलिसांनी यशस्वी तपास करत एका आरोपीस ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून ३ लाख ८० हजार ५०० रुपये किमतीचा सोन्याचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११:४५ ते सायंकाळी ६:१५ वाजण्याच्या दरम्यान बायजाबाई सोसायटी, पाईपलाईन रोड येथील बाळासाहेब रेवाजी पवार (वय ५५ वर्षे) यांच्या राहत्या घराचे कुलूप अज्ञात चोरट्याने तोडले. त्याने घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातील लॉकरमधून १ लाख ५७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम तसेच त्यांच्या घरामागे राहणारे अमोल सूर्यकांत झेंडे यांचे १ लाख ८२ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी बाळासाहेब पवार यांच्या फिर्यादीवरून १३ नोव्हेंबर रोजी तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ), ३३१(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच राजश्री प्रमोद रसाळ यांच्या घरफोडीप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४)) अन्वये सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरीचा गुन्हा नोंद होता.



दोन्ही गुन्ह्यांचा तपास सुरू असताना छत्रपती संभाजीनगर येथील जवाहरनगर पोलीस ठाण्यात घरफोडीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या अजय महावीर भुक्तर (रा. सिद्धार्थनगर, दूध डेअरीसमोर, हिंगोली, ता. जि. हिंगोली) याने अहिल्यानगरमधील या घरफोडीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी ट्रान्सफर वॉरंट घेऊन त्याला या गुन्ह्यांमध्ये अटक केली. पोलीस कोठडीत सखोल चौकशी व विचारपूस केल्यानंतर त्याने दोन्ही गुन्ह्यांची कबुली देत त्याच्याकडून ३ लाख ८० हजार ५०० रुपये किमतीचे सुमारे ४ तोळे वजनाचे सोन्याचे तीन लगड हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, सहायक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण, सहायक फौजदार तन्वीर शेख, पोलीस हेड कॉन्स्टेबल गोरख काळे, नितीन उगलमुगले, दीपक गांगर्डे, पोलीस कॉन्स्टेबल विशाल कुलकर्णी, अमोल गाडे आणि अंमलदारांनी केली आहे.

दरोड्यातील फरार आरोपी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद



नगर – समृद्धी महामार्गावर आयशर वाहन दुरुस्त करत असताना चाकूचा धाक दाखवून मारहाण करत मोबाईल व रोकड लुटल्याच्या दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपीस अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे. तसेच चौकशीदरम्यान या गुन्ह्यातील एका फरार साथीदाराचे नावही निष्पन्न झाले आहे.

८ सप्टेंबर रोजी समृद्धी महामार्गावर आयशर कंपनीची गाडी दुरुस्त करत असलेल्या फिर्यादी व साक्षीदार यांना अज्ञात सहा जणांनी चाकूचा धाक दाखवला आणि लाथाबुक्यांनी मारहाण करत मोबाईल व रोख रक्कम जबरीने लुटून नेली होती. याप्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी हा दरोड्याचा गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पथकाने यापूर्वीच धनंजय उर्फ धनु प्रकाश काळे (वय २७, रा. भोजडे चौकी, संवत्सर, ता. कोपरगाव), स्वप्नील संतोष भारूड (वय २०, रा. भीमवाडी, ता. कोपरगाव), प्रशांत जालींदर भारूड (वय २०, रा. भीमवाडी, ता. कोपरगाव) आणि शिवरंजन राजेश शिंदे (वय २२, रा. बिरोबा चौक, संवत्सर, ता. कोपरगाव) यांना ताब्यात घेऊन गुन्ह्याची उकल केली होती. मात्र चंदू नारायण तहकीक (रा. सावळीविहीर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) व त्याचा एक साथीदार गुन्हा घडल्यापासून फरार होते.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार विजय पवार, अभिजीत अरकल, रणजीत जाधव, बाळासाहेब गुंजाळ, अजिनाथ पाखरे आणि फुरकान शेख यांचे पथक फरार आरोपीचा शोध घेत होते. २३ नोव्हेंबर रोजी गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे चंदू नारायण तहकीक हा कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण शिवारात असल्याची माहिती मिळाली. पथकाने तत्काळ कारवाई करत चंदू तहकीक याला ताब्यात घेतले. त्याला विश्वासात घेऊन त्याच्या अनोळखी साथीदाराबाबत विचारपूस केली असता, त्याने त्याचे नाव अक्षय सुखदेव जाधव (रा. सावळीविहीर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर; हल्ली रा. पुणे, फरार) असल्याचे सांगितले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी केली असून, फरार आरोपीचा पुढील शोध सुरू आहे.

जाहीर नोटीस

तमाम जनता व विशेषतः प्रकाशपूर को-ऑप. हौसिंग सोसायटी (मिडल क्लास) लि., मेघाग्नी चौक, मिस्कीन मळा रोड, सावेडी, अहिल्यानगर ४१४००३ यांचे सर्व सभासद यांना कळविणेत येते की, सावेडी हद्दीतील टी.पी.स्कीम नं. ४ मधील फायनल प्लॉट्स ज्याचा जुना स.नं.९९ ही जमीन बिगर शेती करुन त्यात सभासदांना घरे बांधण्यासाठी प्लॉटस् पाडण्यात आले. सन १९६० सालात जे प्लॉटधारक होते त्या सर्वांनी प्रकाशपूर को-ऑप. हौसिंग सोसायटी (मिडल क्लास) लि. ही रजिस्टर्ड सोसायटी स्थापन केली. सदर सोसायटीचे सभासदांना त्यांचे नावावर असलेल्या प्लॉटची अगर फ्लॅटची विक्री करणे असल्यास त्यांना सोसायटीने लिहून दिलेल्या प्लॉटचे खरेदीखतातील अटीप्रमाणे सोसायटीचे मॅनेजिंग कमिटीस खरेदी घेण्याचा अधिकार आहे. सदरची अट सर्व सभासदांवर बंधनकारक आहे, तरीही काही सभासद बिल्डर्स अथवा इतर कोणीही खरेदीदार व्यक्ती यांचे आहारी जाऊन परस्पर त्यांचे प्लॉटची अगर घराची विक्री करण्याचे विचारात आहेत, तरी कोणीही बिल्डर, डेव्हलपर, प्रमोटर, कॉन्ट्रॅक्टर, इस्टेट एजंट, मुंतवणूकदार, बँका/वित्तीय संस्था अथवा इतर कोणीही खरेदीदार व्यक्ती अगर संस्था यांनी सदर सोसायटीचे सभासदांशी त्यांचे प्लॉटबाबत अगर घराबाबत सोसायटीची लेखी पूर्वसंमती घेतल्याशिवाय खरेदी, विक्री, साठेखत, विकसन करारनामा, कुलमुखत्यारपत्र, गहाण, दान, बक्षीस, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. केल्यास तो सोसायटीचे मॅनेजिंग कमिटीवर बंधनकारक राहणार नाही व व्यवहार करणारास कायद्याने कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत. तसेच सोसायटीची लेखी संमती न घेता एखाद्या प्लॉटचे अगर घराचे खरेदीखत अथवा हस्तांतरणाचा अन्य कोणताही दस्त करुन घेतल्यास, अशा खरेदीदारास अगर हस्तांतरितास सोसायटीचे सभासद म्हणून दाखल करुन घेतले जाणार नाही व सोसायटीच्या दफतरी त्यांचे नाव नोंदविले जाणार नाही. अशा व्यवहारातून होणाऱ्या कोणत्याही नुकसानीस सोसायटी जबाबदार राहणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, कळावे.

ठिकाण: अहिल्यानगर
दिनांक: २३/११/२०२६

सही/-
ॲड. अभिजीत रमेश भालेराव
पत्ता : फ्लॅट नं. ३, कमलपुष्प अपार्टमेंट, सावली चौक, नवले नगर, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर - ४१४००३
मो.9730843071

(रविंद्र विल्यम गायकवाड, चेअरमन)
प्रकाशपूर को-ऑप. हौसिंग सोसायटी (मिडल क्लास) लि.,
मेघाग्नी चौक, मिस्कीन मळा रोड, सावेडी, अहिल्यानगर ४१४००३ यांचे करीता)

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेले प्लॉटस विक्रीचा करार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविणेत येते की, सदर प्लॉटसबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षिसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट, अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिष्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे प्रमाणित नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. विहित मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास, ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट मिळकत वर्णन – जिल्हा अहिल्यानगर, पोट तुकडी नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मे. दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्य क्षेत्रातील मौजे मोरचूद नगर येथील प्लॉटस ७/१२ रेकॉर्ड प्रमाणे खालील वर्णनाचे –
मौजे मोरचूद नगर येथील स.नं. ४४/१ मधील प्लॉटस

अ. क्र.	प्लॉटनं.	हिस्सानं.	क्षेत्रफळ(चौ.मी)	पुर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१	१२	१८	१२० चौ.मी.	प्लॉट नं. ११	प्लॉट नं. ०२	प्लॉट नं. १३	९.०० मी. रस्ता
२	११	१९	१२० चौ.मी.	प्लॉट नं. १०	प्लॉट नं. ०३	प्लॉट नं. १२	९.०० मी. रस्ता
३	१०	२०	१२० चौ.मी.	प्लॉट नं. ९	प्लॉट नं. ०३	प्लॉट नं. ११	९.०० मी. रस्ता
४	९	२१	१२० चौ.मी.	प्लॉट नं. ८	प्लॉट नं. ४	प्लॉट नं. १०	९.०० मी. रस्ता

येणे प्रमाणे प्लॉटस मिळकती.
सदर मिळकतीचे विद्यमान मालक – जुगलकिशोर हुकमीचंद उपाध्ये आणि राजी जुगलकिशोर उपाध्ये रा: चावंड निवास,नगर पुणे रोड, विनायक नगर, द्वारकानगरी, अहिल्यानगर-४१४००१.

ॲड. निर्मल सुरेश लोढा
ऑफिस – साई रत्न, दत्त मंदिर जवळ, प्रेमदान चौक, सावेडी, अहिल्यानगर. मो. ७५०७५०६३६३

मागणी सूचना

ट्रूहोम फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

नोंदणीकृत कार्यालय: श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५, जुना क्र. ११ दुसरी गल्ली, सिनातोफा रोड, अलवारपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; मुख्यालय : लेव्हल - ३, वोव्हार्ट टॉवर्स, ईस्ट विंग सी-२, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१ वेबसाइट: http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी नमूद केलेले कर्जदार यांनी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी होम फायनान्स लिमिटेडचे असे म्हणणे आहे की, हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहात. म्हणून या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम २००२ (सरफेसी कायदा) अन्वये आणि कलम - १३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्तावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सूचनेव्यतिरिक्त, त्यांना या जाहिर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे. कलम १३ (२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार, सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रक्कमेचा तपशील दिलेला आहे.

कर्जदार/सह-कर्जदार/नाव आणि पत्ता	सुरक्षित मालमत्तेचा पत्ता	मागणी सूचनेनुसार दिनांक आणि थकबाकी रक्कम रुपयात
लोन क्रमांक - SLPHAMDRO000751 १. श्री. ज्ञानेश्वर पांडुरंग घोत्रे (कर्जदार) २. सौ.मालनबाई पांडुरंग घोत्रे (सह-कर्जदार) पत्ता: H. NO.17 S.NO. 26 2 B 2 1 भाग उत्तर बाजूचा प्लॉट, शेवगाव रोड आनंद नगर पाथर्डी,आगसखांड पाथर्डी अहमदनगर-४१४१०२ बाबा कन्स्ट्रक्शन, आनंद नगर पाथर्डी, आगसखंड, पाथर्डी, अहमदनगर-४१४१०२ कर्जाची रक्कम - रु. ११४७८४६/- लोन क्रमांक - SLPHAMDRO000751 एनपीए तारीख - ०३/११/२०२६	दिगरशेती भूखंड, स.नं. २६/२/बी/२/१, ज्याचे एकूण क्षेत्रफळ १.५२.६२ रु. म्हणजेच १५२.६२ चौ. मीटर आहे, त्यापैकी उत्तरेकडील पूर्व-पश्चिम भूखंडाचे क्षेत्रफळ ०.३८.०० रु. म्हणजेच ३८.०० चौ. मीटर आहे. हा भूखंड पाथर्डी, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर येथील असून त्याच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत- पूर्व : रस्ता पश्चिम : दामाले यांच्या मालकीचा भूखंड दक्षिण : स.नं. २६/२/बी/२/१ मधील पांडुरंग नामदेव घोत्रे यांच्या मालकीचा भूखंड उत्तर : मेजर पालवे यांच्या मालकीचा भूखंड	मागणी नोटीस दिनांक -१६-११-२०२६ मागणी सूचनेची रक्कम - रु. १२,४२,३१५.८७/- (अक्षरी : बारा लाख बेचाळीस हजार तीनशे पंधरा रुपये आणि सत्त्याऐंशी पैसे मात्र). कर्ज खाते क्र. SLPHAMDRO000751 (दिनांक १३-११-२०२६ रोजीच्या स्थितीनुसार) शी संबंधित असून, त्यासोबत यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज, तसेच अनुषंगिक खर्च इत्यादींचाही समावेश आहे.

त्यामुळे, कर्जदार म्हणून आपणास सूचित करण्यात येते की, या नोटीसच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत वर नमूद केलेली थकीत रक्कम पूर्णपणे अदा करावी; अन्यथा, वर नमूद केलेल्या तारण मालमत्तेच्या अंमलबजावणीसाठी सरफेसी कायद्यांतर्गत कारवाई करण्यास खाली सही करणारे (आम्ही) भाग पडू. कृपया नोंद घ्यावी की, उक्त कायद्याच्या कलम १३(१३) अन्वये, आमच्या संमतीशिवाय वर नमूद केलेली तारण मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास आपणास मनाई करण्यात आली आहे.

ठिकाण : अहिल्यानगर
दिनांक : २४-११-२०२६

सही/- अधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

गृहिणी

आरोग्य

निरोगी जीवनशैली

आजच्या धावपळीच्या काळात माणसाची जीवनशैली खूप अनियमित झाली आहे. सकाळी उठण्याची वेळ ठरलेली नसते, रात्री झोपण्याची वेळ ठरलेली नसते, जेवणाची वेळ ठरलेली नसते आणि कामाचीही शिस्त राहिलेली नाही. अनेकजण रात्री उशिरापर्यंत जागे राहतात, सकाळी उशिरा उठतात, त्यामुळे दिवसाची सुरुवातच आळसाने होते. भूक लागली तरी वेळेवर जेवण होत नाही, कधी उपाशी राहणे होते तर कधी बाहेरचे तेलकट, तिखट आणि मसालेदार पदार्थ खाल्ले जातात. पाणी कमी पिणे, सतत बैठे काम करणे, शारीरिक हालचाल न करणे, दिवसरात्र भ्रमणध्वनी आणि संगणकाच्या समोर बसणे यामुळे शरीराला विश्रांती मिळत नाही आणि मनालाही शांतता मिळत नाही. याचा परिणाम म्हणून थकवा, डोकेदुखी, अपचन, वजन वाढणे, रक्तदाब वाढणे, मधुमेह, निद्रानाश, चिडचिडेपणा आणि नैराश्य यांसारख्या समस्या वाढत चालल्या आहेत. लहान मुलांपासून ते मोठ्या माणसांपर्यंत सगळेच या अनियमित जीवनशैलीचे बळी ठरत आहेत. या सगळ्यातून बाहेर पडायचे असेल तर आपल्याला पुन्हा एकदा शिस्तबद्ध जीवन जगायला शिकले पाहिजे. सकाळी लवकर उठून थोडा वेळ चालणे, व्यायाम करणे, मोकळ्या हवेत बसणे, वेळेवर आणि सात्विक जेवण करणे, पुरेसे पाणी पिणे, काम आणि विश्रांती यामध्ये समतोल ठेवणे, रात्री झोपण्यापूर्वी भ्रमणध्वनी बाजूला ठेवणे, मन शांत ठेवण्यासाठी थोडा वेळ प्रार्थना किंवा ध्यान करणे, कुटुंबासोबत वेळ घालवणे आणि निसर्गाच्या जवळ जाणे हे उपाय खूप उपयोगी ठरतात. आपण एकदम सगळे बदल करू शकत नसलो तरी रोज थोडा थोडा बदल केला तरी हळूहळू शरीराला सवय लागते आणि मनालाही समाधान मिळते. वेळेवर झोपणे आणि वेळेवर उठणे हीच खरी औषधे आहेत. आपले आरोग्य हे आपल्या हातात आहे हे लक्षात ठेवून रोजच्या सवयींमध्ये सुधारणा केल्यास निरोगी जीवन मिळेल.

पाककला

चॉकलेट सोन पापडी

साहित्य : बेसन १ वाटी, मैदा १/२ वाटी, साजूक तूप १ वाटी, साखर १ १/२ वाटी, पाणी ३/४ वाटी, कोको पावडर २ चमचे, चॉकलेटचे तुकडे १/२ वाटी, वेलची पावडर १/२ चमचा, बदाम पिस्त्याचे काप २ चमचे, तूप लावलेली थाळी १

कृती : प्रथम एका जाड बुडाच्या कढईत साजूक तूप गरम करा. त्यात बेसन आणि मैदा घालून मध्यम आचेवर सतत ढवळत खरपूस भाजून घ्या. पीठ सोनेरी रंगाचे होऊन तुपाचा सुगंध सुटला की गॅस बंद करून ते मिश्रण बाजूला ठेवा. दुसऱ्या भांड्यात साखर आणि पाणी घालून एकतारी पाक तयार करा. पाक तयार झाला की त्यात कोको पावडर घालून चांगले मिसळा. नंतर त्यात चॉकलेटचे तुकडे घालून वितळवून घ्या. आता भाजलेले पीठ हळूहळू या पाकात घालून भरभर ढवळा. त्यात वेलची पावडर घाला. मिश्रण थोडे घट्ट झाले की ते तूप लावलेल्या थाळीत ओता. वरून बदाम पिस्त्याचे काप घालून हलक्या हाताने दाबा. मिश्रण कोमट असतानाच सुरीने चौकोनी किंवा आयताकृती वड्या पाडा. पूर्ण थंड झाल्यावर वड्या सोडवून घ्या. तयार चॉकलेट सोन पापडी हवाबंद डब्यात ठेवा.

वास्तू

घरात मनीप्लांट कुठे लावावा?

* मनी प्लांट आग्नेय दिशेला लावावा, कारण ही शुक्राची दिशा आहे आणि येथे मनी प्लांट लावल्याने पैसा खेचला जातो. मनी प्लांट कधीही ईशान्य दिशेला लावू नये.

* घड्याळ नेहमी उत्तर किंवा पूर्व भिंतीवर लावावे आणि ते कधीही बंद पडू देऊ नये, बंद घड्याळ प्रगती थांबवते.

सौंदर्य

* रात्री झोपण्यापूर्वी चेहरा स्वच्छ धुवूनच झोपावे.

* टोमॅटोचा रस चेहऱ्यावर लावल्यास तेलकटपणा कमी होतो.

सल्ला

कांदा चिरताना डोळे जळू नयेत म्हणून कांदा थोडा वेळ पाण्यात भिजवून ठेवा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२६

---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, रोहिणी २०।३६, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.

राशिभविष्य

मेष : कामात वेग राहील. आर्थिक स्थिती स्थिर राहिल.

वृषभ : कुटुंबात आनंदी वातावरण राहिल. जुनी गुंतवणूक फायदेशीर राहिल.

मिथुन : नवीन संधी मिळतील. प्रवास शक्य.

कर्क : मन शांत राहील. खर्चावर नियंत्रण ठेवा.

सिंह : नोकरीत मान-सन्मान वाढेल. आरोग्य चांगले.

कन्या : मित्रांची मदत मिळेल. काम पूर्ण होतील.

तूळ : व्यवसायात प्रगती. भागीदारीत लाभ.

वृश्चिक : अडकलेले पैसे मिळण्याची शक्यता. आत्मविश्वास वाढेल.

धनु : शिक्षण/स्पर्धेत यश. धार्मिक कार्यात रुची वाढेल.

मकर : जबाबदारी वाढेल. संयम ठेवावा लागेल.

कुंभ : उत्पन्नाचे नवीन मार्ग सापडतील. सामाजिक संबंध सुधारतील.

मीन : कल्पनाशक्तीला वाव मिळेल. कला क्षेत्रासाठी चांगला दिवस. मागील उधारी वसुल होईल.

शब्दगंध क्र. ७५६२ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) शेवटचा; अखेरचा ३) गरीब; नीतिमान; प्रामाणिक ५) खिडकी; वातायन; झरोका ६) झाकण असलेले भांडे ८) एक फूल; पंकज; कमळ १०) विवर; रिकामे असलेले; भरीव नसलेली ११) छप्पर शिवण्यासाठीची दाभण किंवा सुई १२) चपटा; थप्पड; सपाट १४) सह्याद्रीच्या पायथ्यापासून समुद्रापर्यंतचा दक्षिणेकडचा प्रदेश १६) दम; शक्ती; जुलूम; व्यायामाचा एक प्रकार १८) कालच्या आदला किंवा उद्याच्या नंतरचा दिवस १९) पांढऱ्या रंगाचे एक सुगंधी फूल २१) वरिष्ठास द्यावयाची भेटवस्तू २४) हर; प्रत्येक; किंमत; भाव २५) गोळा करणे; जमविणे

उभे शब्द :- १) अंजनीचा पुत्र म्हणून मारुतीला असेही म्हटले जा २) फळातील रसाळ भाग; गर ३) पाहणारा; पाहणाऱ्याने दिलेली जबानी; पुरावा ४) पक्का बांधलेला रस्ता ७) कानात घालावयाचा एक दागिना ९) कणीदार; दाणेदार १०) कोठा; उदर १२) नोकर; पाईक; दास १३) एक चर्मवाद्य; मृदंग; पखवाज १५) कोन; कॉर्नर १७) दक्षिणा वाटण्याची जागा १९) अतिशय आनंद; हर्ष २०) फळातील रसाळ भाग; खोबरे २२) नीर; जीवन; पाणी २३) शेत; जंगल; वन; वावर

शब्दगंध क्र. ७५६१ चे उत्तर

वि	घ	ट	न	■	स	रा	व
घा	र	■	व	ट	वा	घू	ळ
त	■	प	थ	क	■	■	व
क	स	दा	र	■	उ	ख	ळ
■	द	र्प	■	■	डा	■	■
हं	रा	ण	■	क	ण	ख	र
वा	■	■	■	ल	ट	■	ब
न	शी	ब	■	प	प्पू	■	र

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : यश त्यालाच मिळते जो पडूनही पुन्हा उठायला शिकतो.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

सूर्य आग आहे तर तो विझत का नाही?

तुम्ही जर कधी रात्री आकाशाकडे पाहिलं असेल तर तुम्हाला चांदण्या दिसतात ना, त्या चांदण्या म्हणजे खरं तर खूप खूप लांब असलेले सूर्यच आहेत, आपला सूर्य हा आपल्याला जवळचा आहे म्हणून तो मोठा आणि गरम वाटतो, बाकीचे सूर्य खूप लांब आहेत म्हणून ते छोटे ठिपके वाटतात, हीच तर खरी गंमत आहे. आता आपण आपल्या सूर्याकडे परत येऊया. तुम्हाला वाटतं सूर्याला आग लागली आहे, म्हणजे कोणीतरी मोठी काडी लावली असेल आणि तो पेटलाय, पण खरं तर तसं अजिबात नाहीये. आपण घरी आईने लावलेला दिवा पाहतो, त्या दिव्याला वात लागते, तेल लागतं आणि हवा लागते, हवा नसेल तर दिवा विझतो, आपण फुंकर मारली की दिवा विझतो, पाऊस पडला की आग विझते, कारण आपल्या घरची आग ही रासायनिक आग आहे, तिला जळायला ऑक्सिजन नावाचा वायू लागतो.

पण सूर्याच्या बाबतीत हे सगळं वेगळं आहे, सूर्याच्या आजूबाजूला अवकाश आहे, तिथे हवा नाहीये, ऑक्सिजन नाहीये, तरीही सूर्य विझत नाही, कारण त्याची आग ही आपल्या आगीसारखी नाहीच, ती एक वेगळ्याच प्रकारची ऊर्जा आहे. सूर्य हा साधारण पंच्याहत्तर टक्के हायड्रोजन आणि पंचवीस टक्के हेलियम या वायूंनी बनलेला आहे, आणि त्याच्या अगदी मधोमध, त्याच्या पोटात, एक खूप मोठी भट्टी चालू असते, तिथलं तापमान आहे जवळजवळ दीड कोटी डिग्री सेल्सिअस, म्हणजे तुम्ही कल्पनाही करू शकणार नाही इतकं गरम, आपल्या घरातला सर्वात गरम तवा सुद्धा फक्त दोनशे तीनशे डिग्री असतो, पण सूर्याच्या पोटात दीड कोटी डिग्री आहे. या प्रचंड गरमीमुळे आणि प्रचंड दाबामुळे हायड्रोजनचे अणू एकमेकांना खूप जोरात धडकतात, ते एकमेकांना घट्ट मिठी मारतात आणि त्यातून हेलियम तयार होतं, आणि ही मिठी मारताना थोडीशी वजनाची घट होते, आणि त्या कमी झालेल्या वजनाचं रूपांतर होतं प्रकाशात आणि उष्णतेत, यालाच शास्त्रज्ञ फ्युजन म्हणतात. म्हणजे सूर्य दर सेकंदाला साठ कोटी टन हायड्रोजनचं हेलियममध्ये रूपांतर करतो, विचार करा, एका सेकंदात साठ कोटी टन, म्हणजे आपल्या सगळ्या गावातल्या ट्रकपेक्षा जास्त वजन, आणि तरीही त्याच्याकडे अजून इतकं इंधन आहे की तो अजून पाचशे कोटी वर्षे असाच जळत राहणार आहे. तुम्ही म्हणाल, मग सूर्यावर पाणी टाकलं तर तो विझेल का?

तर नाही बाळांनो, सूर्यावर पाणी टाकलं तर ते पाणी पोहोचायच्या आधीच त्याची वाफ होऊन जाईल, कारण सूर्य इतका गरम आहे की पाणी तिथपर्यंत पोहोचूच शकत नाही, आणि जरी पोहोचलं तरी पाण्यातही हायड्रोजन असतो, त्यामुळे उलट सूर्याला अजून इंधनच मिळेल, म्हणजे सूर्य विझण्याऐवजी अजून भडकेल. मग सूर्याला कोणी थांबवू शकतं का? नाही, कारण सूर्याला दाबून ठेवणारं त्याचं स्वतःचं वजन आहे, त्याचं वजन इतकं जास्त आहे की ते सतत त्याला आत दाबतं, आणि या दाबामुळेच आत गरमी तयार होते, आणि गरमीमुळे फ्युजन चालू राहतं, आणि फ्युजनमुळे बाहेरून दाब येतो, त्यामुळे सूर्य ना आत कोसळतो ना बाहेर फुटतो, तो एकदम बॅलन्समध्ये असतो, जसं तुम्ही फुगा फुगवता तेव्हा आतली हवा आणि बाहेरची हवा यांचा बॅलन्स असतो, तसंच सूर्याचा बॅलन्स आहे. आता तुम्ही विचाराल, मग सूर्य कायमच असा राहणार का? तर शास्त्रज्ञ सांगतात की अजून पाचशे कोटी वर्षांनी सूर्याचं हायड्रोजन थोडं कमी होईल, तेव्हा तो फुगायला लागेल, तो इतका मोठा होईल की तो बुध, शुक्र यांना गिळून टाकेल, आणि पृथ्वीच्या जवळ येईल, तो लाल रंगाचा होईल, त्याला आपण लाल राक्षस म्हणतो, आणि त्यानंतर तो हळूहळू आकुंचन पावेल आणि पांढरा बुटका तारा होईल, म्हणजे एक छोटा, थंड होत जाणारा गोळा होईल, पण ही गोष्ट इतकी खूप खूप वर्षांनंतर होणार आहे की आपल्या पृथ्वीवर तोपर्यंत कितीतरी नवीन नवीन गोष्टी घडून गेलेल्या असतील. म्हणून बाळांनो, सूर्य विझत नाही कारण तो पेटलेला नाहीये, तो आतून चमकणारा, स्वतःचं इंधन स्वतः बनवणारा, स्वतःच्या वजनाने स्वतःला पेटवून ठेवणारा एक जिवंत तारा आहे. तो आपल्याला प्रकाश देतो, उष्णता देतो, झाडांना वाढायला मदत करतो, पाऊस पाडायला मदत करतो, आपलं अन्न पिकवायला मदत करतो, म्हणजे सूर्य नसेल तर आपलं काहीच होणार नाही, आपण सगळे थंडीने गोठून जाऊ. त्यामुळे सूर्याला फक्त आग समजू नका, तो तर आपल्या सगळ्या सृष्टीचा बाबा आहे, आपला मोठा मित्र आहे, जो कधीच विझत नाही, कारण त्याच्या पोटातली जादू कधीच संपत नाही, अगदी तुमच्या मनातल्या कुतूहलासारखी, तुम्ही जेवढे प्रश्न विचाराल तेवढे नवीन प्रश्न तयार होतील, आणि हेच कुतूहल तुम्हाला एक दिवस मोठा शास्त्रज्ञ बनवेल, कोण जाणे, कदाचित तुम्हीच पुढे जाऊन सूर्यापेक्षाही भारी शोध लावाल.

निसर्गाची काळजी

एका छोट्या गावात राणी नावाची मुलगी राहायची. तिला फुलं खूप आवडायची. पण तिला एक वाईट सवय होती, ती रोज बागेतली फुलं तोडायची, झाडांच्या फांद्या मोडायची आणि खाऊन झालेले कागद तिथेच फेकायची.

एके दिवशी तिला दिसलं, बागेतली फुलं कमी झाली आहेत, पक्षी येत नाहीयेत, झाडं सुकत चालली आहेत. तिला खूप वाईट वाटलं. ती तिच्या आईकडे गेली. आई म्हणाली, बाळा, झाडं ही आपली मित्र आहेत. आपण त्यांना तोडलं तर ते आपल्याला सावली, फळं आणि शुद्ध हवा कशी देणार? आपण निसर्गाला जपलं तरच निसर्ग आपल्याला जपेल.राणीला आपली चूक कळली. दुसऱ्या दिवसापासून तिने फुलं तोडणं बंद केलं. तिने घराजवळ एक छोटंसं रोप लावलं, त्याला रोज पाणी घालू लागली, बागेतला कचरा उचलू लागली.तिच्या मैत्रिणींनी पण तिला साथ दिली. काही महिन्यांत बाग पुन्हा फुलांनी भरून गेली, पक्षी परत आले, सगळीकडे हिरवळ पसरली. राणी खूप खुश झाली.

तात्पर्य : निसर्ग हा आपला खरा मित्र आहे. आपण त्याची काळजी घेतली तर तो आपल्याला हवा, पाणी, सावली आणि आनंद देतो. म्हणून झाडं लावूया, पाणी वाचवूया आणि कचरा टाकणं टाळूया.

आत्मशक्ति



अध्यात्मिक शक्ती

जर भविष्यात क्रोधापासून होणाऱ्या परिणामांवर आम्ही ध्यान दिले तर आम्ही क्रोध करणार नाही. असेही होईल की एखादा मनुष्य आमचा क्रोध जागा करील तेव्हा आपणा स्वतःस समजवावे की जर आपण क्रोधमय विचार वा क्रोधयुक्त भाषण वा हालचालीत राहिलो तर आपला काहीच फायदा होणार नाही. ह्या विचाराने आम्ही क्रोधावर हळू हळू नियंत्रण ठेवणे शिकू. आम्ही स्वतःला बजावू शकतो की आपण जर क्रोध करीत राहिले तर आपणापुढे अनेक अडचणी उभ्या राहतील आणि असाही विचार करू शकतो की, अमुक माणसाने मला दुःख दिले व असे करून माझ्यापुढे अडचणी उभ्या केल्या अशा वेळी मला राग यावा का? व असे करून आपल्या अडचणी वाढवाव्यात का? क्रोधाने होणाऱ्या आपल्या नुकसानीकडे लक्ष दिले तर मग आपल्या मनास आपण प्रशिक्षण देऊ शकतो ज्यामुळे क्रोधाने उद्भवणाऱ्या परिस्थितीतही आम्ही क्रोध करत नाही. असेच एकदा भगवान बुध्दांनी केले होते.

एकदा त्यांना क्रोधात येऊन एका माणसाने भलेबुरे शब्द, अपशब्द वापरले. भगवानांनी शांतपणे ऐकून घेतले. त्यांच्या शिष्यांना ह्याबाबत फार वाईट वाटले. त्या माणसाचा सूड घ्यावा असे त्यांना वाटले. परंतु भगवान बुध्दांनी म्हटले की, तुझ्या ह्या देणगीचा मी स्वीकार करीत नाही. अशाप्रकारे अशी त्या शिव्यांची भेट त्या माणसाकडेच राहिली. त्याचा भगवान गौतम बुध्दांवर जरासुध्दा परिणाम झाला नाही.आपल्या क्रोधावर नियंत्रण ठेवण्याची अशी एक पध्दत आहे की आपण आपले लक्ष्य निश्चित करावे. आमच्या भजन अभ्यासाचे लक्ष्य निश्चित करून त्या अध्यात्मिक कामात प्रगती साधण्यासाठी निश्चित वेळ घालविला तर क्रोधाला आपल्या मनात शिरकाव होऊ देण्यापासून स्वतःला वाचवू शकतो. जर क्रोध आलाच तर स्वतःला बजावावे की जर मी क्रोधाला माझ्यावर आक्रमण करू दिले तर भजन अभ्यासाचा अमूल्य वेळ मी वाया घालवित आहे.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

नाती घट्ट विणू या

शिवानीदीदी : बरोबर. त्यामुळेच तो निर्णय त्यांच्या योग्य-अयोग्यच्या व्याख्येनुसार बरोबर ठरतो. पण मुलांच्या योग्य असण्याच्या व्याख्येशी तो जुळेलच असं नाही. जर दोन्ही बाजूंचे संस्कार आणि क्षमता सारख्या असतील तर तो त्या दोघांनाही बरोबर वाटेल. हे काही बाबतींतच शक्य आहे, सगळ्या नाही.जेव्हा पालक मुलांना, आम्ही म्हणतोय म्हणून तू हे कर, असं सांगतात तेव्हा परिस्थिती बिघडते. कदाचित मुलं स्वतःची बुद्धिमत्ता वापरण्याऐवजी त्यांच्या पालकांचं भीतीपोटी, प्रेमापोटी, आदरापोटी किंवा कर्तव्य म्हणून ऐकतील.

सुरेश ओबेरॉय : बऱ्याचशा कुटुंबांमध्ये, लोकांना मोठ्यांच्या सल्ल्याप्रमाणे वागायला सांगितलं जातं.

शिवानीदीदी : मोठे जे सांगतात ते बरोबरच असतं पण ते त्यांच्या क्षमतांप्रमाणे बरोबर असतं. समजा, तुम्ही एखाद्याला त्याचं आरोग्य चांगलं राहावं यासाठी दररोज सकाळी दोन किलोमीटर चालण्याचा सल्ला दिला. चालण्याचे आणि शुद्ध हवेचे फायदे समजावून सांगितले. तुम्ही म्हणताय ते सगळं बरोबर आहे.

सुरेश ओबेरॉय : पण निम्मं अंतर चालल्यानंतर तो चक्कर येऊन पडूही शकतो.

शिवानीदीदी : तुमचा सल्ला बरोबर होता तरीही असं का झालं? कारण, तुमच्या मतानुसार दोन किलोमीटर चालणं फार काही अवघड नसून तो तुमच्या दिनचर्येचा भाग आहे. पण तोच सल्ला इतरांना देताना अगोदर तुम्ही त्यांच्या क्षमतेचं मोजमाप केलं नाही.

सुरेश ओबेरॉय : पण ऐकणाऱ्याने त्याच्यावर अंमलबजावणी करण्यापूर्वी त्याचं मूल्यमापन का केलं नाही? शिवानीदीदी : तुम्ही आत्ताच उदाहरण दिलं की, अनेक लोक भीती, आदर किंवा जबाबदारी यांच्या दडपणाखाली येऊन मोठ्यांचं ऐकतात. त्यामुळे दिलेल्या सल्ल्यावर विचार करण्याची शक्यताच नसते. मुलांनी पालकांचं ऐकलं नाही तर काही पालक त्यांना भावनिकरीत्या ब्लॅकमेल करतात किंवा भविष्यात होणाऱ्या परिणामांची भीती दाखवतात.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

नवरा : अगं एक ना आपल्यात खूप भांडण होतात ना तर आपण एक पूजा करू या! पंडितजी ग्राहशांती पूजा करायची आहे, किती खर्च लागेल?

पंडितजी : एकवीस हजार रू. लागतील

बायको : अहो मला फक्त पाच हजार द्या अजिबात भांडणार नाही मी...

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातील सर्वात मोठा कालवा कोणता?

- सुएझ कालवा

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

रात्रभर साचलेले पित्त व त्यावर परत चहा यामुळे पित्त अजूनच वाढते व लगेच हमखास उलटी होते. याकरिता सकाळी पातळ पदार्थ घेणे टाळावे. रात्री झोपतानाच दात घासून झोपावे व सकाळी झोपेतून उठल्या उठल्या जाडसर गोड पदार्थ खावा. उदा. भाजलेली पोळी, शिरा, चार-पाच खजूर, सात-आठ काळे मनुके, दोन-तीन बदाम, नाचणीचा लाडू, एखादीला गोड पदार्थ आवडत नसल्यास तूप लावून पोळी खावी किंवा कमी तिखट भाजी व पोळी खावी. पाणी एकदम पिऊ नये. थोडे थोडे पाणी

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

सारखे पित राहावे. पातळ पदार्थही थोडे थोडे सारखे घ्यावेत.

उदा. दूध, चहा सकाळी ९ वाजल्यानंतर घ्यावा. घडु पदार्थांमुळे रात्रभर साचलेले पित्त तो पदार्थ पचवायच्या कामी लागते; त्यामुळे उलटी होत नाही. पहिल्या तीन महिन्यांमध्ये गर्भवतीने रोज एक फॉलिक सिडची गोळी घ्यावी तसेच याकरिता नाचणीच्या सत्त्वाची जाडसर लापशी सकाळी उठल्या बरोबर खावी किंवा नाचणीच्या सत्त्वाची दुधाबरोबर खीर खावी किंवा नाचणीचा लाडू खावा.

यामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम व लोह असते. जर फॉलिक सिडची कमतरता झाली, तर बाळाच्या स्पाइनल कॉर्डमध्ये दोष निर्माण होण्याची शक्यता असते. त्याकरिता ही काळजी घेण्यास हवी.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

'हिंद सेवा मंडळा'च्या पेमराज सारडा महाविद्यालय, नगर आणि ब्रिटनच्या इन्फोरेन्स ग्लोबल यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार

अहिल्यानगरच्या विद्यार्थ्यांना मिळणार आंतरराष्ट्रीय शिक्षणाच्या संधी



पेमराज सारडा महाविद्यालय व ब्रिटनमधील 'इन्फोरेन्स ग्लोबल लिमिटेड' यांच्यात महत्त्वपूर्ण शैक्षणिक सामंजस्य करार झाला. यावेळी संस्थेचे मानद सचिव सुमतीलाल कोठारी, उपाध्यक्ष रवींद्र गुलाटी, इन्फोरेन्स ग्लोबल लिमिटेडचे सीईओ यश गुलाटी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालक डॉ. पारस कोठारी, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, प्रा.स्वाती पवार, प्रा.राजेश पाटणी, शुभम गांधी आदी उपस्थित होते.

नगर – जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि जागतिक करिअरच्या संधी सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पेमराज सारडा महाविद्यालय व ब्रिटनमधील इन्फोरेन्स ग्लोबल लिमिटेड यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार झाला आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शुल्क न आकारता मोफत परदेशी शिक्षण व करिअर मार्गदर्शन मिळणार असून, एका गुणवत्ताधारक विद्यार्थ्याला 'दादा वामन जोशी' यांच्या नावे १५ लाख रुपयांची शिष्यवृत्तीही जाहीर करण्यात आली आहे. संस्था केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना जागतिक संधींसाठी सक्षम करत आहे, अशी माहिती हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव सुमतीलाल कोठारी यांनी दिली.

हिंद सेवा मंडळाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत पेमराज सारडा महाविद्यालय व ब्रिटनमधील 'इन्फोरेन्स ग्लोबल लिमिटेड' यांच्यात हा महत्त्वपूर्ण सामंजस्य शैक्षणिक करार झाला. यावेळी सुमतीलाल कोठारी, उपाध्यक्ष रवींद्र गुलाटी, इन्फोरेन्स ग्लोबल लिमिटेडचे सीईओ आणि हिंद सेवा मंडळाचे सदस्य यश गुलाटी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालक डॉ. पारस कोठारी, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, प्रा.स्वाती पवार, प्रा.राजेश पाटणी, शुभम गांधी आदी उपस्थित होते. या उपक्रमाचे मंडळाचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, माजी मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष आनंत देसाई, चेअरमन मधुसूदन सारडा, ब्रिजलाल सारडा यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

पुणे, मुंबई, दिल्ली, बेंगळुरू आणि चेन्नईसारख्या मोठ्या शहरांतील विद्यार्थ्यांना करिअर सल्लागार आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन सहज मिळते; मात्र लहान शहरे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या संधींपासून वंचित राहावे लागते. ही तफावत दूर करून स्थानिक प्रतिभेला जागतिक व्यासपीठ मिळवून देणे, हा या कराराचा मुख्य उद्देश आहे. हा करार पेमराज सारडा महाविद्यालयासोबत झाला असला, तरी जिल्ह्यातील इतर महाविद्यालयांतील तसेच ग्रामीण व निमशहरी भागातील सर्व विद्यार्थ्यांना याचा लाभ घेता येणार आहे, अशी माहिती रवींद्र गुलाटी यांनी दिली.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी जगभरातील विद्यापीठे, अभ्यासक्रम, राहण्याचा खर्च, शिष्यवृत्ती आणि रोजगाराच्या संधी याबाबत सखोल मार्गदर्शन केले जाईल. सध्या परदेशात उच्च शिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षित विद्यार्थी मार्गदर्शकांशी थेट संवाद साधण्याची संधीही विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यामध्ये अभ्यासक्रम व विद्यापीठ निवड, प्रवेश अर्ज, सीव्ही, स्टेटमेंट ऑफ पर्पज व शिफारस पत्रे तयार करणे, परीक्षेच्या तयारीसाठी अधिकृत आणि विश्वासार्ह सराव चाचण्या, शिष्यवृत्ती व शैक्षणिक कर्ज सल्ला, विद्यार्थी व्हिसा, वर्क परमिट तसेच परदेशातील निवास, अर्धवेळ नोकरी आणि मानसिक आरोग्य सहाय्य या सर्व सेवा पूर्णपणे मोफत दिल्या जाणार आहेत.

इन्फोरेन्स ग्लोबल लिमिटेडचे सीईओ यश गुलाटी यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नवीन तंत्रज्ञानामुळे जागतिक उद्योगक्षेत्र वेगाने बदलत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ प्रवेश मिळवून देण्यापुरते न ठेवता उद्योन्मुख उद्योग, भविष्यातील कौशल्ये आणि बदलत्या व्हिसा व नोकरीच्या नियमांनुसार तयार केले जाईल. भौगोलिक मर्यादा, आर्थिक अडचणी किंवा माहितीच्या अभावामुळे कोणताही पात्र विद्यार्थी मागे राहू नये, हा या उपक्रमाचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित यांनी या उपक्रमाचे स्वागत करत यामुळे विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या नव्या साधी उपलब्ध होणार असल्याने ते यश मिळवतील असे नमूद केले. मार्गदर्शन आणि शिष्यवृत्तीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी पेमराज सारडा महाविद्यालयात किंवा ahilyanagarinforens.com या ईमेलवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



सेंट विवेकानंद स्कूलमध्ये कचरा व्यवस्थापन व पर्यावरण संवर्धनाबाबत आयोजित जनजागृती कार्यक्रम.

'गुडबाय सिंगल यूज' मोहिमेतून विद्यार्थ्यांना दिला स्वच्छतेचा संदेश

'एकच लक्ष्य – शहर स्वच्छ' उपक्रमांतर्गत कचरा व्यवस्थापन व पर्यावरण संवर्धनाची जनजागृती

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या 'एकच लक्ष्य – शहर स्वच्छ' आणि 'गुडबाय सिंगल यूज' मोहिमेअंतर्गत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये कचरा व्यवस्थापन व पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महानगरपालिकेच्या सुवर्णा वाघ यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात ओला कचरा, सुका कचरा आणि घरगुती घातक कचरा यांचे वर्गीकरण कसे करावे, त्याचे योग्य व्यवस्थापन कसे करावे, याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. प्रत्येक घरात किमान दोन कचरापेट्या ठेवून कचऱ्याचे विलगीकरण करणे, वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि एकल वापराच्या प्लास्टिकला पर्याय म्हणून कापडी पिशव्यांचा वापर करणे, याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

शाळेचा परिसर स्वच्छ व कचरामुक्त ठेवण्यासाठी प्रत्येक वर्गातून स्वच्छता प्रतिनिधी नेमण्याची संकल्पना मांडण्यात आली. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग घेण्यात आला. योग्य उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना कापडी पिशव्या व पर्स भेट देऊन प्रोत्साहित करण्यात आले. तसेच शाळेला कापडी पिशव्या देऊन पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देण्यात आला

कार्यक्रमाला इयत्ता सहावी व सातवीचे विद्यार्थी, त्यांचे वर्गशिक्षक, शाळेच्या प्राचार्या गीता तांबे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा तसेच अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रुपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेश मध्यान उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश आपल्या घरापर्यंत पोहोचवून पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. 'प्लास्टिकला नकार, स्वच्छतेला होकार' या संदेशातून स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक शहर घडविण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन या कार्यक्रमातून करण्यात आले.

किल्ले बनवा स्पर्धेतून मुलांना मिळाला हार न मानण्याचा संदेश

विकास पालवे यांचे प्रतिपादन; स्नेहबंध सोशल फौंडेशनतर्फे जिल्हास्तरीय स्पर्धेचे पारितोषिक वितरण



साई ट्रॉफीचे सचिन पेंडुरकर, नगर जल्लोषचे सागर बोगा, माजी मुख्या. बाजीराव जाधव, निखिल नरवणे, सचिन तुपे, शुभम भगत, प्रथमेश राठोड आदी उपस्थित होते.

नगर – दिवाळीमध्ये किल्ले बनविण्याची परंपरा जतन व्हावी, बालगोपाळांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, शौर्य आणि गड-किल्ल्यांविषयी आवड निर्माण व्हावी, तसेच त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनतर्फे आयोजित जिल्हास्तरीय किल्ले बनवा स्पर्धा २०२६ चा पारितोषिक वितरण समारंभ अहिल्यानगर हेड पोस्ट ऑफिस येथे पार पडला. यावेळी जिल्हा अधीक्षक डाकघर विकास पालवे यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले, तर शिल्पकार बालाजी वल्लाल यांच्या वतीने विजेत्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची आकर्षक मुद्रा भेट देण्यात आली. या अनोख्या भेटीमुळे बालस्पर्धकांचा आनंद द्विगुणित झाला.

यावेळी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, उपअधीक्षक डाकघर प्रमोद भोसले, आरजे प्रसन्न, शिल्पकार बालाजी वल्लाल, सुप्रिया खामकर, राष्ट्रपती पोलीस पदकप्राप्त पोलीस निरीक्षक अंबादास हुलगे, राष्ट्रपती पोलीस पदकप्राप्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अन्वरअली सय्यदअली सय्यद, माजी प्राचार्य एकनाथ जगताप, पत्रकार अनिल हिवाळे,

आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता तयार होईल

विकास पालवे म्हणाले की, या स्पर्धेमध्ये बालगोपाळांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह व उत्सुकता पाहायला मिळाली. किल्ला बनविणे हा केवळ एक छंद किंवा स्पर्धा नसून त्यातून मुलांना मेहनत, चिकाटी, कल्पकता आणि आयुष्यात कधीही हार न मानण्याची प्रेरणा मिळते. प्रत्येकाने आयुष्यात कोणतेही आव्हान आले तरी हार न मानता प्रयत्न करत राहिले पाहिजेत, हा महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून मिळतो. स्नेहबंध सोशल फौंडेशनने आयोजित केलेला हा सुंदर उपक्रम आहे.

किल्ले बनवा स्पर्धेतील विजेत

या स्पर्धेत प्रथम क्रमांक राजवीर व रक्षित भगत, द्वितीय क्रमांक स्वराज काकडे, तर तृतीय क्रमांक आयुष द्वारके यांनी पटकावला. उत्तेजनार्थ पारितोषिक रुद्र आडसूळ व विनायक बाल मंडळ यांना देण्यात आले. याशिवाय स्पर्धेतील सात बालस्पर्धकांचा विशेष सन्मान सन्मानपत्र देऊन करण्यात आला. तसेच चित्रकला प्रकारात उत्कृष्ट चित्र साकारल्याबद्दल ईशानी खामकर हिला ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



नाशिक उपपीठांतर्गत अहिल्यानगर, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक या पाच जिल्ह्यांतील भक्तांसाठी आयोजित जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या दोन दिवसीय समस्या मार्गदर्शन सोहळ्यात देहदान करणाऱ्या नातेपाईकांचा सन्मान आ.संग्राम जगताप व आ.सत्यजित तांबे यांच्या हस्ते करण्यात आला. (छायाचित्र : समीर मन्यार)

अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालूनच उत्तम जीवन जगता येते

नरेंद्राचार्य महाराज यांचे प्रतिपादन; देहदान व अवयवदान करणाऱ्या पाच जिल्ह्यांतील दात्यांच्या कुटुंबीयांचा गौरव

नगर – अंधश्रद्धेला बळी पडून जीवन उद्धवस्त करून घेण्यापेक्षा मन आध्यात्मिक, डोळे विज्ञानवादी आणि बुद्धी वास्तववादी ठेवणे आवश्यक आहे. अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घालूनच माणसाला उत्तम जीवन जगता येते असे प्रतिपादन रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज (दक्षिण पीठ, नाणीज धाम) यांनी केले. नाशिक उपपीठांतर्गत अहिल्यानगर, जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक या पाच जिल्ह्यांतील भक्तांसाठी अहिल्यानगर येथे आयोजित दोन दिवसीय समस्या मार्गदर्शन व देहदान करणाऱ्या नातेवाईकांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमास आ.सत्यजित तांबे, आ.संग्राम जगताप, आ.अमोल खताळ, महापौर ज्योती गाडे, उद्योजक संजय गारुडकर, धनश्री विखे, महानगरपालिकेचे उपआयुक्त येलगट्टे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, विजय पठारे आदींसह भाविक उपस्थित होते.

या वेळी नरेंद्राचार्य महाराज यांनी सामाजिक, पर्यावरणीय आणि शैक्षणिक विषयांवर भूमिका मांडत संप्रदायाच्या माध्यमातून सुरू असलेल्या सामाजिक उपक्रमांची माहिती देताना सांगितले की, आतापर्यंत राज्यभरातून २६८ जणांचे देहदान शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना केले आहे. अहिल्यानगर येथे या पाच जिल्ह्यांतील २६ देहदात्यांच्या नातेवाईकांचा आज सन्मान करण्यात आला. तसेच ६ ते २० डिसेंबर दरम्यान राज्यभर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून यातून किमान दोन लाख रक्तपिशव्या संकलित करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळग्रस्त परिस्थिती पाहता नोव्हेंबर महिन्यात जलसंधारणासाठी अडीच ते तीन हजार वनराई बंधारे बांधण्याचे कामही युद्धपातळीवर सुरू असून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी संप्रदायाने यंदा ६ लाख १८ हजार नवीन रोपांची लागवड केली आहे.

समाजातील वाढती अराजकता आणि अंधश्रद्धा रोखण्यासाठी शाळा व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात वेद-विज्ञान आणि अध्यात्माचा समावेश करण्याची गरज आहे धर्मांतराचे प्रकार रोखण्यासाठी आणि समाजाला स्वावलंबी बनवण्यासाठी योग्य संस्कार व वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे गरजेचे आहे. आतापर्यंत १ लाख ५७ हजार कुटुंबांची घरवापसी करण्यात यश आले आहे. असेही त्यांनी नमूद केले.

'बी.फार्मसी' विद्यार्थ्यांसाठी नवीन पाठ्यपुस्तक प्रकाशित



डॉ. संकेत लोढा



डॉ. योगेश बाफना

नगर – फार्मसी शिक्षण क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाची वाढती गरज लक्षात घेऊन प्रथम वर्ष बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी बेसिक्स ऑफ पायथॉन प्रोग्रामिंग फॉर फार्मास्युटिकल सायन्सेस या नवीन पाठ्यपुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले आहे. या पुस्तकाचे लेखन डॉ. संकेत लोढा आणि डॉ. योगेश बाफना यांनी केले असून, पुणे येथील टेक नॉलेज पब्लिकेशन्स यांनी हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने हे पुस्तक विशेषतः प्रथम वर्ष बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आले आहे. आजच्या डिजिटल युगात फार्मसी क्षेत्रामध्ये संगणकीय तंत्रज्ञान, डेटा विश्लेषण आणि प्रोग्रामिंग कौशल्यांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना Python Programming ची मूलभूत संकल्पना सम जावून देणे आणि त्याचा औषधनिर्माणशास्त्रातील उपयोग समजून घेण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये संगणकीय विचारक्षमता, तांत्रिक कौशल्ये आणि आधुनिक फार्मास्युटिकल क्षेत्रासाठी आवश्यक असलेली डिजिटल साक्षरता विकसित करण्याच्या दृष्टीने या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.

या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांना प्रोग्रामिंग विषयाची मूलभूत ओळख होण्यासोबतच भविष्यातील संशोधन, औषध विकास आणि तंत्रज्ञानाधारित फार्मसी शिक्षणासाठी नवी दिशा मिळण्यास मदत होईल. या पुस्तकाची प्रत महाविद्यालयांच्या केंद्रीय ग्रंथालयासाठी, फार्मसी विभागीय ग्रंथालयासाठी तसेच प्रथम वर्ष बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून घेता येणार आहे. हे पुस्तक ॲमेझॉनवर ऑनलाइन देखील उपलब्ध आहे. या शैक्षणिक योगदानाबद्दल दोन्ही लेखकांचे फार्मसी शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन होत असून, हे पुस्तक विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधकांसाठी उपयुक्त संदर्भग्रंथ ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

सुनिल अडसूळ यांची आयडॉल शिक्षक म्हणून निवड



नगर – अहिल्यानगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसुळ यांची महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी सन २०२६-२०२७ मध्ये आयडॉल शिक्षक म्हणून निवड केली आहे. शाळेमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना देणे. नाविन्यपूर्ण अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करणे आणि त्यांच्या अनुभवाचा लाभ संपूर्ण शिक्षण विभागाला तज्ञ मार्गदर्शक म्हणून करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने मागील वर्षी याबाबत शासन निर्णय जाहीर केला होता. त्यानुसार शासनाच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) पुणे यांनी सन २०२६ -२७ मध्ये राज्यातील आयडॉल शिक्षकांची अंतिम यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील प्रयोगशील तंत्रस्नेही सुनिल अडसूळ यांची निवड झाली आहे.

सुनिल अडसूळ यांनी माथणी शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम गावाच्या सहकार्याने राबवले आहेत. शाळेत लोकसहभागातून संगणक लॅबची निर्मिती करून विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे धडे दिले जातात. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होऊन त्यांच्या कल्पनाशक्तीला, निरीक्षणशक्तीला वाव मिळण्यासाठी लोकसभागातून विज्ञान व गणित विषयाची भव्य अशी प्रयोगशाळा निर्मिती केली. विद्यार्थी आनंदाने विविध प्रयोग करून निष्कर्ष काढतात त्यामुळे त्यांच्यामध्ये संशोधन मूल्य रुजले आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी शाळेत कायमस्वरूपी निरंतर वाचन उपक्रम राबविला जातो. शाळेत लोकसहभागातून कुसुमाग्रज वाचनालय सुरू केले आहे. शाळेत लोकसहभागातून भव्य अशी सेंद्रिय परसबाग निर्मिती करून विद्यार्थ्यांना सेंद्रिय शेतीचे कृतीतून धडे दिले जातात. पर्यावरण संवर्धन करण्यासाठी प्रदूषण मुक्त सणसमारंभ, वृक्ष संवर्धन, एक पेड माँ के नाम, पर्यावरण पूरक वस्तूनिर्मिती, सेंद्रिय खत निर्मिती प्रकल्प असे अनेक उपक्रम राबविले जातात. मागील वर्षी भारत सरकारने आयोजित केलेल्या राष्ट्रीय वीरगाथा स्पर्धेत त्यांच्या विद्यार्थीनीची राष्ट्रीय पातळीवर सुपर शंभरमध्ये निवड होऊन तिला भारताचे उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, संरक्षण राज्यमंत्री संजय शेठ व शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी, तिन्ही दलांचे प्रमुख, संरक्षण सचिव, शिक्षण सचिव यांच्या हस्ते भारत सरकारचा राष्ट्रीय वीरगाथा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी तिचे मार्गदर्शक शिक्षक सुनिल अडसूळ यांचाही गौरव करण्यात आला. तसेच भारत सरकारने शिक्षक सुनिल अडसूळ व त्यांच्या विदयार्थीनीला प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमासाठी नवी दिल्ली येथील शासकीय कार्यक्रमासाठी निमंत्रित केले होते. अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम सुनिल अडसुळ यांनी शाळेत राबविले आहेत. भारत सरकारने आयोजित केलेल्या राष्ट्रीय पर्यावरण स्पर्धेत त्यांच्या विद्यार्थ्यांनी कृतिशील सहभाग घेऊन यश मिळविले. या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवर शासनाने प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान केला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अहिल्यानगर जिल्हा परिषदेने जिल्हा शिक्षक पुरस्कार प्रदान केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

कार्तिकी एकादशीनिमित्त खंडोबा मंदिरात विठ्ठल-रुक्मिणी व महादेवांना लोण्याचे वस्त्र



नगर – मल्हार चौक, स्टेशन रोड येथील खंडोबा मंदिरात कार्तिकी एकादशीनिमित्त भक्तिमय वातावरणात धार्मिक विधी करण्यात आले. यानिमित्त मंदिरातील विठ्ठल-रुक्मिणी मूर्तींना गाईच्या लोण्यापासून वस्त्र परिधान करण्यात आले, तर महादेवांना पण लोण्याचे वस्त्र अर्पण करण्यात आले. देवतांच्या या आकर्षक लोणी वस्त्र सजावटीने मंदिरातील वातावरण अधिक प्रसन्न आणि भक्तिमय झाले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी या विशेष सजावटीचे दर्शन घेतले.

कार्तिकी एकादशी हा भगवान विष्णू आणि विठ्ठल भक्तांसाठी अत्यंत महत्त्वाचा धार्मिक दिवस मानला जातो. आषाढी एकादशीपासून सुरू झालेल्या चातुर्मासाची सांगता कार्तिकी एकादशीला होते, अशी धार्मिक मान्यता आहे. या दिवशी उपवास, हरिनाम जप, भजन, कीर्तन, पूजा-अर्चा आणि विठ्ठल दर्शनाला विशेष महत्त्व असते. भक्ती, संयम, आत्मशुद्धी आणि ईश्वरचिंतनाचा संदेश देणाऱ्या या पर्वामुळे वारकरी संप्रदायात कार्तिकी एकादशीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

मंदिरातील महिला मंडळाच्या वतीने संपूर्ण कार्तिक महिन्यात दररोज पहाटे काकड आरती, पूजा, अभंग आणि आरती असे धार्मिक कार्यक्रम नियमितपणे करण्यात आले. पहाटेच्या भक्तिमय वातावरणात महिला एकत्र येऊन विठ्ठल नामस्मरण आणि अभंग गायन करत असल्याने मंदिर परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. कार्तिक महिन्यात श्रद्धेने आणि नित्यनेमाने केलेल्या या उपक्रमातून महिलांनी धार्मिक परंपरा जपण्याबरोबरच सामूहिक भक्तीचा आदर्श निर्माण केला.

या धार्मिक उपक्रमात शारदा दारुणकर, वंदना कानडे, विजया कानडे, सुशीला गांगर्डे, विजया अकोलकर, विद्या कुलकर्णी, पूनम थोरात, सुजाता दारुणकर, मंगल दहीहंडी, बबई दळवी, कांता दळवी, कुसुम नागवडे, सांगता दहिवळकर, सुख्खा दळवी, रेणुका औसरकर, शोभा शिंदे, सिंधूबाई, संगीता चिपाडे, लक्ष्मीबाई दळवी, धामणे, कावरे, गुळे, शैला अंगरे, मंगल पहिल्डे, नीलम अग्रवाल, गुजर भाभी, पद्मा सिंग, भाभी गुप्ता, मनिषा कुलकर्णी, दिव्या कुलकर्णी, जगदाळे, सुनिता दारुणकर आदी महिला सहभागी झाल्या.

महिला मंडळाच्या पुढाकारातून कार्तिक महिनाभर सुरू असलेल्या काकड आरती आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे मंदिरातील भक्तीपरंपरेला उत्साह मिळाला. कार्तिकी एकादशीच्या विशेष सजावटीने या उपक्रमाची सांगता भक्तिमय वातावरणात झाली. धार्मिक परंपरा जपण्याबरोबरच महिला सहभागातून मंदिरात नियमित भक्ती उपक्रम राबविण्याची भावना यावेळी दिसून आली.




आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशनच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या एसा एपीएल सीझन-४ बॉक्स क्रिकेट स्पर्धेची लिलाव प्रक्रिया पार पडली. (छायाचित्र : लहू दळवी)

‘एसा एपीएल सीझन ४’ च्या क्रिकेट स्पर्धा २७ नोव्हेंबरपासून नगरमध्ये सुरु होणार

लिलाव प्रक्रिया पार; २० संघ, १४० सभासदांचा सहभाग

नगर – आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या वतीने सलग चौथ्या वर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या एसा एपीएल सीझन-४ बॉक्स क्रिकेट स्पर्धेची लिलाव प्रक्रिया पार पडली. एकूण २० संघ आणि १४० सभासदांचा सहभाग असलेली ही संस्थेची वर्षातील सर्वात मोठी क्रीडा स्पर्धा २७ ते २९ नोव्हेंबरदरम्यान साईनगर टर्फ येथे रंगणार आहे.

या स्पर्धेसाठी एस. आर. जे. स्टील हे प्लॅटिनम प्रायोजक आहेत. तर कोनॅटस इंटरप्रायझेस, टोस्टेम विंडोज आणि शनिराज इंटरनॅशनल मॉल हे गोल्ड प्रायोजक आहेत. याशिवाय व्यंकटेश इन्फ्रा, अंबिका स्टोन क्रशर, श्रीराम मार्बल, जी टेक, डायकिन एसी, श्री आनंद सेल्स, वैष्णवी टाईल्स, पंकज स्टील ट्रेडर्स, श्री आनंद ट्रेडिंग कंपनी, अभय सेल्स कॉर्पोरेशन, संकल्प इंटरप्रायझेस, आर्टिको लिफ्ट्स, डायमंड टाईल्स, शुभारंभ टाईल्स अँड ग्रॅनाइट, ढोणे ट्रेडर्स, पटेल सिरॅमिक आणि सम्राट इलेक्ट्रिकल यांनी सिल्व्हर प्रायोजक म्हणून सहभाग नोंदविला आहे.

एकूण ४० साखळी सामने आणि ७ बाद फेरीतील सामने

संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी उपस्थितांचे स्वागत करताना सांगितले की, यंदाचा स्पर्धा सोहळा मोठ्या स्वरूपात आयोजित करण्यात येणार आहे. स्पर्धेत एकूण ४० साखळी सामने आणि ७ बाद फेरीतील सामने खेळविण्यात येणार आहेत. लिलाव प्रक्रिया आयपीएलच्या धर्तीवर पार पडावी, यासाठी पुण्याहून सनीत मुथा आणि अंकित कोठारी यांची टीम निमंत्रित करण्यात आली होती. २५ आणि २६ नोव्हेंबर रोजी कल्याण रोड येथील पॉवर टर्फवर सराव सामने होणार असून, मुख्य स्पर्धेचे सामने २७ ते २९ नोव्हेंबरदरम्यान साईनगर टर्फ येथे खेळविण्यात येणार आहेत.

चार वर्षांपासून हा उपक्रम

संस्थेच्या स्पोर्ट्स कमिटीचे अध्यक्ष जितेश सचदेव म्हणाले की, संस्था मागील चार वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवित आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून सप्लायर, कंपनी डीलर, उत्पादक, बांधकाम व्यावसायिक, आर्किटेक्ट आणि इंजिनिअर्स यांच्यातील संबंध अधिक दृढ होतात. स्पर्धेमुळे एक कौटुंबिक वातावरण निर्माण होऊन व्यावसायिक संबंध विकसित होण्यासही चालना मिळते.

शारीरिक तंदुरुस्ती आणि व्यायामाचे महत्त्व अधोरेखित

संस्थेच्या सभासदांमध्ये खेळीमेळीचे वातावरण निर्माण होऊन संस्थेची एकी अधिक बळकट होण्यास या उपक्रमाचा उपयोग होतो. त्याचबरोबर शारीरिक तंदुरुस्ती आणि व्यायामाचे महत्त्व अधोरेखित करून त्यासाठी वेळ देण्याचा संदेश सभासद, ट्रेडर्स, सप्लायर आणि नगरकरांना अशा स्पर्धांच्या माध्यमातून देता येतो, असे त्यांनी सांगितले.

स्पर्धेचे समन्वयक संकेत पादीर यांनी स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा सहकारी बँकेचे संचालक सचिन जगताप यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती दिली.

लिलाव प्रक्रियेदरम्यान सर्व प्रायोजक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अविनाश देवी, आकिब काझी, प्रथमेश सोनावणे, अहमद अली काझी, ओमकार म्हसे, अभिजित शिंदे, सागर ढगे आणि शुभम आगरकर हे कमिटी सदस्य परिश्रम घेत आहेत. संस्थेचे सचिव भूषण पांडव यांनी आभार मानले.

राहाता व सिन्नर येथे मोफत मराठा वधु वर परिचय मेळावा

लाभ घेण्याचे अशोक कुटे यांचे आवाहन

नगर – जगदंब फाउंडेशन संचलित मराठा सोयरीक संस्था व अखंड मराठा समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नगर जिल्ह्यात राहाता व नाशिक जिल्ह्यात सिन्नर येथे मोफत मराठा वधु वर परिचय मेळावा आयोजित केले असल्याची माहिती मराठा सोयरीक संस्थेचे अध्यक्ष अशोक कुटे व जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश शिवाजी लंघे यांनी दिली आहे. ११४ वा मोफत मेळावा राहाता तालुक्यात लोणी येथे वरदविनायक सांस्कृतिक भवन येथे २९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केला आहे, तर ११५ वा मोफत मेळावा हा नाशिक जिल्ह्यातील सिन्नर शहरात मातोश्री नर्मदा लॉन्स येथे ६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या दोन्ही मेळाव्यांचा लाभ घेण्याचे आवाहन प्रकाश जोंधळे, राजाराम मुंगसे, जयश्री कुटे, सचिन निर्मळ, श्रीकांत बिडवे, सोमनाथ डोळे, नारायण जाधव, कमलेश कोते, सोमनाथ डोळे, डॉ. संजय उबाळे, दत्ता गायकवाड, अनिल घोलप, भास्करराव घुले, भाऊसाहेब सहाणे, सचिन आहेर, मराठासेवक मनोज सोनवणे, गोरक्षनाथ पटारे, अशोक गाडे, अनिताताई कोतकर, सागर मोरे यांनी आवाहन केले आहे.

ज्यांची लग्न जमत नाही तेच मुलं वधू वर मेळाव्याला येतात हा गैरसमज आहे. गेल्या चार वर्षापासून अनेक उच्चशिक्षित वधु वर व पालक या मेळाव्याला येत असतात व अशा मेळाव्याच्या माध्यमातून व संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत ५००० पेक्षा जास्त लग्न मराठा सोयरीक संस्थेकडून जमलेले आहेत. त्यापैकी ५६७ लग्न विधवा, विधुर घटस्फोटीत यांची झालेली आहेत. ११३ मेळावे झालेले आहेत. धर्मादाय कार्यालयात जगदंब फाउंडेशन अंतर्गत मराठा सोयरीक संस्थेची अधिकृत नोंदणी केलेली आहे. त्यामुळे अविवाहित, विधवा, विदुर, घटस्फोटीत अशा सर्वच क्षेत्रातील विविध वधु वर पालकांनी या मेळाव्याला बायोडाटा सोबत घेऊन येणे गरजेचे आहे. मेळाव्याला आल्यानंतर अनेक जणांचे एकमेकांसोबत जुनी ओळख निघते नातंगोत निघते. त्यामुळे लग्न जमण्यास मदत होते. वेळेची व पैशांची बचत होते. हा मेळावा पूर्णपणे मोफत आहे. वधू वर पालकांना समोरासमोर स्थळे पाहून एकमेकांसोबत चर्चा करण्याची संधी येथे मिळत असते. राहाता – लोणी येथील मेळाव्यास शालिनीताई विखे पाटील व वरद विनायक देवस्थानचे मठाधिपती ह भ प उद्धव महाराज मंडलिक यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या संस्थेचे अहिल्यानगर, पुणे, नाशिक येथे संपर्क कार्यालय आहेत. अधिक माहितीसाठी ८४५३९०२२२२.

कामगार कल्याण केंद्रात मंडळाचा वर्धापनदिन साजरा

नगर – महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे अहिल्यानगर कामगार कल्याण केंद्रात २२ नोव्हेंबर रोजी कामगार कल्याण मंडळाचा ८८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी केंद्र सभासद व कामगारांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ घेण्यात आला व शिशु मंदिर मुलांना गोड खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी वर्धापनदिनाचे आदित्य साधुन मंडळाच्या विविध योजना व उपक्रमाची माहिती देण्यात आली. सायंकाळी भजन संध्येचा कार्यक्रम घेण्यात आला. परिसरातील नागरिक व केंद्र सभासदाची उपस्थित लाभली. या कार्यक्रमासाठी केंद्र प्रमुख अनिल बोरसे, ग्रंथपाल सारीका वैद्य, केंद्रसेवक तुकाराम पुंड, योगीता वाळुंज, सविता गहिले आदिंनी परिश्रम घेतले.

महाराष्ट्र बालरोग तज्ञ संघटनेच्या प्रेसिडेंटपदी डॉक्टर सुचित तांबोळी यांची बिनविरोध निवड



नगर – महाराष्ट्र बालरोग तज्ञ संघटनेच्या प्रेसिडेंट इलेक्ट २०१७ आणि प्रेसिडेंट २०१८ या पदासाठी अहिल्यानगर येथील डॉ. सुचित तांबोळी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नगर जिल्ह्याला हा मान प्रथमच मिळत असून या पदावर त्यांच्या आतापर्यंतच्या ३४ वर्षाच्या अनुभवाचा आणि संशोधनात्मक कार्याचा विचार करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाचा संपूर्ण महाराष्ट्रातील बालरोग तज्ञांना दोन वर्ष विविध परिषदांमध्ये उपयोग होणार आहे.

यावर्षी अहिल्यानगर मधील बालरोगतज्ञ डॉ. सागर वाघ यांची राष्ट्रीय पातळीवर एक्झिक्युटिव्ह मेंबर म्हणून दुसऱ्यांदा निवड झाली तर अहिल्यानगर बालरोग तज्ञ संघटनेला २०२८ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील बालरोग तज्ञांची परिषद भरवण्याचा मान मिळाला आहे. अहिल्यानगर बालरोग तज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयदीप देशमुख, सेक्रेटरी डॉ.उज्वला शिरसाट, कोषाध्यक्ष डॉ. संदीप गायकवाड यांनी मेहनत घेऊन सर्व सहकारी बालरोग तज्ञांबरोबर काम करून हे यश संपादन केले.

अहिल्यानगर येथील सरोजताई आल्हाट यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट लेखिका सन्मान पुरस्कार



नगर – येथील कवयित्री व मुक्त पत्रकार सरोज आल्हाट यांना आदिलशहा फारुकी बहुउद्देशीय संस्था जळगाव यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय मॅडम भिकाजी कामा आदर्श महिला – उत्कृष्ट लेखिका सन्मान २०२६ प्रदान करण्यात आला. अल्पबचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव येथे पार पडलेल्या सोहळ्यास जळगावचे जिल्हाधिकारी रोहन बापूराव घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी सौ. वैशाली चव्हाण, मा. आमदार राजू मामा भोळे, फारुक शहा नौमानी, डॉ. जावेद शेख आदी उपस्थित होते.

सरोज आल्हाट या केवळ कवियत्री म्हणूनच नव्हे तर सामाजिक प्रश्नांवर लेखन आणि सक्रिय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्या म्हणूनही ओळखल्या जातात. त्यांचे मराठी तसेच इंग्रजी काव्यसंग्रह प्रकाशित असून ३० वर्षांपेक्षा अधिक काळ त्या लेखन व सामाजिक कार्याच्या क्षेत्रात सक्रिय आहेत. यापूर्वीही त्यांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हास्तरीय अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे.



डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्राच्या पुनर्वसन प्रकल्पासाठी १० गुंठे जागेचे दान जाहीर करून अंध बांधवांच्या सक्षमीकरणासाठी योगदान दिले. (छायाचित्र : विजय मते)

राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्राला १० गुंठे जागेची ऐतिहासिक भेट

नगर – राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र संचलित ‘डॉ.सुधा प्रकाश कांकरिया अंध बंधू-भगिनी कल्याण व पुनर्वसन प्रकल्प’ अंतर्गत अंधत्वाकडून आत्मनिर्भरतेकडे या संकल्पनेला साकार रूप देणारा भूमीपूजन समारंभ तसेच नेत्रतज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड.सचिन भोजने होते. यावेळी डॉ. प्रकाश व डॉ. सुधाताई कांकरिया यांनी राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्राच्या पुनर्वसन प्रकल्पासाठी १० गुंठे जागेचे दान जाहीर करून अंध बांधवांच्या सक्षमीकरणासाठी योगदान दिले. या निर्णयाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधाताई कांकरिया, ॲड. सचिन भोजने, राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्राचे अध्यक्ष भोजराज पाटील, महासचिव दत्तात्रय जाधव, कार्यकारिणी सदस्य प्रदीप लोंढे, पुणे विभागाचे शिवाजी लोंढे, महासचिव जनार्धन कोळसे, अंधजन मंडळाचे अध्यक्ष संभाजी भोर (काका), गोरख दरंदले, अनिल चाबुकस्वार, राजेंद्र फळके, राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र विभाग शाखा नाशिकचे अध्यक्ष विनोद कांबळे, दिव्यदृष्टी दिव्यांग संस्थेचे अध्यक्ष कृष्ण तवले, उपाध्यक्ष संजय गांधी, श्रीकांत माचवे, मंगेश रक्ताटे यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि दृष्टीहीन बंधू-भगिनी उपस्थित होते.

यावेळी स्वप्निल ढवण यांनी अंध दिव्यांग बांधवांसाठी अन्नदान, अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला.

कार्यक्रमादरम्यान डॉ. प्रकाश कांकरिया यांचा ७१ वा वाढदिवस केक कापून आनंदोत्सवात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी दत्तात्रय जाधव यांनी संभाजी भोर यांना रुपये ११,००० ची आर्थिक मदत सुपूर्द केली. तसेच राष्ट्रीय दृष्टीहीन संघ महाराष्ट्र या संस्थेला ‘साई सूर्य दृष्टी सेवा जीवन गौरव पुरस्कार’ प्रदान करून गौरविण्यात आले.

कार्यक्रमात उपस्थित पाहुण्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संघाचे जिल्हा सचिव भूषण पांडव यांनी केले.

भिंगार हायस्कूलमध्ये ४१ वर्षांनंतर स्नेहबंध परिवारचा स्नेहसोहळा



नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भिंगार हायस्कूलच्या १९८५ च्या एसएससी बॅचचा स्नेहमेळावा पार पडला. ४१ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर गुरू-शिष्य आणि सवंगड्यांची झालेली ही भेट बालपणीच्या आठवणींना उजाळा देणारी ठरली. २०२० मध्ये अविनाश बेद्रे, अशोक लोंढे आणि मोहन परभाने यांनी सुरू केलेल्या व्हॉट्सप ग्रुपपासून या प्रवासाची मुहूर्तमेढ रोवली गेली. पुढे कोअर टीमच्या सातत्यपूर्ण नियोजनातून आणि शाळेतील अधिकृत नोंदींवरून शोधमोहीम राबवून ग्रुपची सदस्य संख्या १०० च्या पुढे नेण्यात आली. दिवाळी सुट्ट्यांचा विचार करून एकमताने १५ नोव्हेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय मुळे यांच्यासह प्रकाश डेरे, आप्पासाहेब गावडे, आसरा धाडगे, हेमलता गिते, कल्पना कुकडे, निर्मला होनराव आणि माधुरी दंडवते या गुरुजनांच्या उपस्थितीने सोहळ्याला शोभा आली. वयोमानानुसार थकवा असतानाही उपस्थित राहिलेल्या गुरुजनांचे कृतज्ञतापूर्वक पूजन व आशीर्वाद घेण्यात आले.

या वेळी बॅचमधील विविध क्षेत्रांत कार्यरत सवंगड्यांचा गौरव करण्यात आला. महेश नागरी बँकेचे व्हाईस चेअरमन नितीन शिंगवी, १९८५ बॅचमध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या सुजाता मोरे, ८९ वेळा रक्तदान करणारे श्रीकांत वराडे आणि १४०० हून अधिक गाणी गाणारे गिरीश कुलकर्णी यांचा सन्मान व कौतुक करण्यात आले. रेणुका बजाज-जाजू यांनी रचलेली कविता स्मृतीचिन्हावर कोरण्यात आली.

साहित्यिक सुनील राऊत यांच्या आम्ही जिंकणारच या १५ व्या पुस्तकाचे प्रकाशन स्नेहबंध परिलारातील मितर, मैत्रिणींच्या हस्ते पार पडले.

सुनील राऊत आणि मंदा जाधव-खरे यांनी सूत्रसंचालन केले. डिझायनिंग व प्रिंटिंगचे काम श्रीकांत वराडे व कुटुंबियांनी सांभाळले.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये २७ नोव्हेंबर रोजी किडनी विकार मोफत तपासणी शिबीर



नगर – जैन सोशल फेडरेशनद्वारे संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर येथे २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत किडनी विकार मोफत तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात किडनीच्या आजारांचे निदान, उपचार याबाबत मार्गदर्शन केले जाईल. अनुभवी नेफ्रोलॉजीस्ट डॉ. गोविंद कासट व फिजिशियन डॉ. प्राजक्ता पारधे शिबिरात रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

अंगावर सूज येणे, लघवी कमी किंवा लाल होणे, किडनी जंतू संसर्ग, डायलेसिस विषयक उपचार केले जातील. महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत डायलेसिस मोफत करण्यात येईल. शिबिरात सोनोग्राफी, रक्त, लघवी इत्यादी तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जातील.

हॉस्पिटीलमध्ये एम. आर. आय. २५०० रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. (संपर्क : मो. ९४०४२९७४११). डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ९५० रूपये (संपर्क : मो. ९४०५२७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये (संपर्क : मो. ९४०४२९९९११), २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलेसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सॅम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सॅम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२). मोफत बालरोग तपासणी शिबिराच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१- २३२०४७३/ ७४/७५ / ७६.

विश्व हिंदू परिषदेच्या हितचिंतक अभियानाचा अहिल्यानगरमध्ये शुभारंभ

नगर – विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय महामंत्री स्व. अशोक सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त अखिल भारतीय स्तरावर राबविण्यात येणाऱ्या हितचिंतक नोंदणी अभियानाचा अहिल्यानगरमध्ये शुभारंभ करण्यात आला. शहराचे ग्रामदैवत व जागृत देवस्थान असलेल्या श्री विशाल गणपती मंदिरात श्री गणेशाची आरती करून या अभियानाची सुरुवात करण्यात आली.

विभागमंत्री सुनील खिस्ती तसेच श्री विशाल गणेश मंदिर ट्रस्टचे उपाध्यक्ष पंडितराव खरपूडे, विश्वस्त प्रा. माणिक विधाते व फुलसौंदर यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनीही हितचिंतक नोंदणी अभियानात सहभाग नोंदविला.

याप्रसंगी जिल्हा सहमंत्री राजेंद्र चुंबळकर, शरद नगरकर, बजरंग दलाचे जिल्हा संयोजक सोमनाथ चितळकर, दुर्गावाहिनी संयोजिका जयश्री पोटे, धर्मप्रसार प्रमुख अनिल देवराव, जिल्हा मातृशक्ती प्रमुख हिराताई शहापूरे, प्रखंडमंत्री वीरेंद्र शिंदे, बाळी जोशी, अनंत कुलकर्णी, अरुण खिची, ओम पांडे आदी उपस्थित होते.

विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी क्षेत्रात सुरू असलेले कार्य अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने हे हितचिंतक नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. संघटनेचे विचार, कार्य आणि विविध उपक्रम समाजातील अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात तसेच गावागावांत हे अभियान पोहोचविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. हिंदू समाजातील अधिकाधिक नागरिकांनी या अभियानात सहभागी होऊन विश्व हिंदू परिषदेच्या कार्याला सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



श्री विशाल गणपती मंदिरास विश्व हिंदू परिषदेच्यावतीने हितचिंतक नोंदणी अभियानाचा शुभारंभ करताना पदाधिकारी.

कुरकुरित किनोआ डोसा

झटपट रेसिपी

दोस्तांनो, खादाडीसोबतच आरोग्य जपायचं असेल तर किनोआ या धान्याचा डोसा बनवता येईल. अगदी झटपट होणारा हा डोसा तुम्हालाा नक्कीच आवडेल.

साहित्य : एक कप किनोआ, उडदाची, मूगाची आणि तुरीची डाळ प्रत्येकी अर्धा कप, मीठ.

कृती : सर्वात आधी किनोआ पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. साधारण तीन ते चार वेळा हे धान्य धुवा. सर्व डाळी धुवून घ्या. यानंतर किनोआ दहा मिनिटं तर डाळी साधारण तासभर पाण्यात भिजवून ठेवा. यानंतर किनोआ आणि डाळी मिक्सरच्या भांड्यात घाला. त्यात थोडं मीठ घाला आणि वाटून घ्या. हे वाटण तयार झाल्यावर त्यात तिखट, आलं आणि मिरचीचे तुकडेही घालता येतील. आता हे पीठ नॉनस्टीक तव्यावर पसरवा. दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्या. हा कुरकुरीत डोसा सॉस किंवा चटणीसोबत खा.



'ॲडोबी'चे नेतृत्व भारतीयाकडे

अचिव्हर

'मायक्रोसॉफ्ट'चे सत्या नडेला, 'गुगल'चे सुंदर पिचाई आणि 'आयबीएम'चे अरविंद कृष्णा यांच्यानंतर आता आणखी एका भारतीय वंशाच्या तंत्रज्ञान क्षेत्रातील नेत्याच्या नावाची जागतिक स्तरावर चर्चा होत आहे. फोटोशॉप आणि इलस्ट्रेटर यांसारखी लोकप्रिय सॉफ्टवेअर उत्पादने तयार करणाऱ्या 'ॲडोबी' या आघाडीच्या कंपनीच्या नेतृत्वाची जबाबदारी अनिल चक्रवर्ती यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

कंपनीत दीर्घकाळ नेतृत्वाची जबाबदारी सांभाळणारे शांतनू नारायण यांच्या जागी चक्रवर्ती यांची नियुक्ती झाली आहे. शांतनू नारायण यापुढे कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत. 'जनरेटिव्ह एआय'मुळे तंत्रज्ञान क्षेत्रात वेगाने बदल होत असताना 'ॲडोबी'समोर नव्या स्पर्धेचे आव्हान आहे. अशा काळात कंपनीचे नेतृत्व करण्याची जबाबदारी चक्रवर्ती यांच्यावर येणार आहे. या नव्या जबाबदारीबद्दल चक्रवर्ती यांनी आनंद व्यक्त केला आहे. शांतनू नारायण यांच्या नेतृत्वामुळे कंपनीने अनेक दशकांमध्ये मोठी प्रगती केली. आता सर्जनशीलता आणि उत्पादकता वाढवणाऱ्या एजंटिक सॉफ्टवेअरच्या नव्या युगात प्रवेश करताना 'ॲडोबी'च्या पुढील वाटचालीत योगदान देण्यासाठी आपण सज्ज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे सॉफ्टवेअर उद्योगात मोठे परिवर्तन घडत आहे. चित्रनिर्मिती, व्हिडीओ संपादन, डिजिटल मार्केटिंग आणि व्यावसायिक कामकाज यांसारख्या क्षेत्रांमध्ये 'एआय'वर आधारित साधनांचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे 'ॲडोबी'सारख्या कंपन्यांसाठी नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेणे आणि ग्राहकांच्या बदलत्या गरजा ओळखणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. चक्रवर्ती यांचा शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवास तांत्रिक कौशल्य, उच्च शिक्षण आणि कॉर्पोरेट व्यवस्थापन यांचा संगम दर्शवतो. त्यांनी वाराणसी येथील भारतीय तंत्रज्ञान संस्था (बीएचयू) येथून संगणक विज्ञान विषयात अभियांत्रिकीची पदवी मिळवली. त्यानंतर अमेरिकेतील 'मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (एमआयटी) येथून पदव्युत्तर शिक्षण आणि पीएच. डी. पूर्ण केली. 'ॲडोबी'मध्ये येण्यापूर्वी त्यांनी 'इन्फॉमॅटिका' या क्लाउड आणि डेटा व्यवस्थापन क्षेत्रातील कंपनीचे सुमारे चार वर्षे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नेतृत्व केले. याशिवाय, मॅकिन्से, सिमँटेक आणि व्हेरिसाइन यांसारख्या कंपन्यांमध्येही त्यांनी महत्त्वाच्या पदांवर काम केले.



जानेवारी २०२० मध्ये 'ॲडोबी'मध्ये दाखल झाल्यानंतर त्यांनी कंपनीच्या 'डिजिटल एक्स्पिरियन्स' व्यवसायाची जबाबदारी सांभाळली. या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपक्रम आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्याच्या प्रयत्नांमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. चक्रवर्ती यांचा प्रवास भारतीय विद्यार्थ्यांसाठी आणि तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो. उच्च दर्जाचे शिक्षण, तांत्रिक कौशल्य, जागतिक अनुभव आणि बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची क्षमता यांच्या जोरावर जागतिक उद्योगविश्वात नेतृत्वाची संधी मिळवता येते, हे त्यांच्या कारकिर्दीतून अधोरेखित होते.



शेर की जुबानी

* ऐ सूरज, मेरे दोस्त को ये पैगाम देना, खुशी से भरा दिन हंसी की शाम देना
* सुलझा हुआ सा समझते हैं मुझको लोग, उलझा हुआ मुझमें कोई दुसरा भी है।
* उसकी याद आई है, सांसो जरा आहिस्ता चलो, धडकनो से भी इबादत में, खलल पडता है।

टेक्नो वर्ल्ड

'कॉलर'चे नाव दिसल्यामुळे दिलासा!

मोबाईल युजर्सना येत्या १ नोव्हेंबरपासून स्पॅम, बनावट आणि फसव्या कॉल्सपासून दिलासा मिळायला सुरुवात झाली. आता मोबाईलची रिंग वाजताच निनावी फोन असला, तरी नंबरऐवजी कॉल करणाऱ्या व्यक्तीचे नाव दिसू लागले. दूरसंचार कंपन्यांच्या नवीन धोरणानुसार, नोंदवलेले अधिकृत नाव थेट झळकते. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (ट्राय) 'कॉलिंग नेम प्रेझेंटेशन' (सीएएजी) ही नवीन सेवा १ नोव्हेंबरपासून अनिवार्य केली आहे; पण या सेवेचा एक फटकाही बसणार आहे. ज्यांनी त्यांच्या मित्र-मैत्रिणींचे मोबाईलमधील नाव मुद्दाम चुकीचे लिहिले आहे, त्यांचे पितळ उघडे पडण्याची शक्यता आहे.

यापूर्वी मोबाईल युजर्सना अनोळखी क्रमांकावरून कॉल आल्यास त्याची ओळख पटवण्यासाठी 'ट्रूकॉलर' वा तत्सम 'थर्ड पार्टी ॲप्स'चा वापर करावा लागे; पण हे ॲप्स युजर्सच्या 'कॉन्टॅक्ट लिस्ट'वर आधारित नाव दाखवतात अथवा चुकीचे नाव दाखवतात. निनावी क्रमांकासाठी हे ॲप भरवशाचे नाहीत. विशेष म्हणजे ते 'कॉन्टॅक्ट लिस्ट'चा डेटा चोरण्याची भीती असते. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणानुसार, 'सीएनएपी'अंतर्गत तुम्हाला कोणत्याही अनोळखी क्रमांकावरून कॉल येतो तेव्हा कॉलरचे नाव त्याच्या केवायसी प्रक्रियेनुसार तुमच्या मोबाईल स्क्रीनवर दिसेल. त्यासाठी ग्राहकांना आता 'थर्ड पार्टी ॲप्स' डाऊनलोड करण्याची गरज नाही.

या सुविधेमुळे आता सायबर गुन्हेगार अथवा फेक कॉल करणारे लगेच समोर येतील. आता फसवेगिरी करणाऱ्यांचे पितळ उघडे पडेल. अशा लोकांना ओळखणे सोपे होईल. त्यांच्याविषयी तक्रारही दाखल करता येईल. बँकिंग आणि विविध फसव्या योजनांची माहिती देऊन दिशाभूल करणारे, फसवणूक करणारे उघड होतील. क्रेडिट कार्ड, कर्ज आणि टेलिमार्केटिंग कॉल्सपासून सुटका होण्यासाठी या सुविधाचा मोठा वापर होईल. या नवीन फीचरमुळे 'स्कॅम' आणि 'स्पॅम' कॉल्सची लागलीच ओळख होईल. नागरिकांची फसवणूक रोखणे आणि डिजिटल सुरक्षा वाढवण्यासाठी हे पाऊल टाकण्यात आले आहे. ही सेवाची सुरुवात 'फोर जी' आणि 'फाइव्ह जी'वर आधारित नेटवर्कवर सुरू झाली आहे. यामुळे सामान्यांची खोट्या कॉलपासून सुटका झाली आहे. विशेष म्हणजे, हे फीचर आपोआप सुरू झाले. यामुळे लफडेबाजांचे धाबे दणाणले आहे.

माझा दोरीवरच्या उड्या

फिटनेस

अनेकांची व्यायामाची संकल्पना फक्त जीमपुरती किंवा ट्रेडमीलवर चालण्यापुरती मर्यादित असते. पण तंदुरुस्त रहाण्यासाठी जीम किंवा फिटनेस क्लासला जाण्याची आवश्यकता असतेच असं नाही. तुमच्याकडे दोरीच्या उड्या आणि व्यायामाची इच्छा या दोन्ही गोष्टी असतील तर तुम्ही नक्कीच फिट राहू शकता.



दररोज दोरीच्या उड्या मारण्याचे बरेच लाभ आहेत.

* दोरीच्या उड्यांमुळे डोळे, हात आणि पाय यांच्यातलं सहकार्य वाढतं. पाय आणि दोरीच्या हालचालीकडे तुमचं लक्ष नसलं तरी मेंदू या सगळ्या हालचालींची नोंद ठेवत असतो. दोरीच्या उड्या मारताना विविध प्रकारच्या हालचाली केल्यामुळे अवयवाचं सहकार्य अजूनच वाढतं.

* उड्या मारताना होणाऱ्या हालचालींमुळे मेंदूलाही नवं खाद्य मिळतं. यामुळे तुमच्या मज्जासंस्थेचा मेंदू, पाय आणि हातांशी संवाद वाढतो. भविष्यात याचे बरेच लाभ होतात.

* दररोज ठराविक वेळ दोरीच्या उड्या मारल्यामुळे तुमच्या कॅलरी खर्च होतात. जास्तीत जास्त कॅलरी खर्च करण्यासाठी उड्यांचा वेग वाढवता येईल.

* या व्यायामामुळे पायाचा खालचा भाग तसंच पोटरीच्या स्नायूंना बळकटी मिळते.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या दर्जाचे काय?

एआय वर्ल्ड

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने आज काही सेकंदांत फोटो, व्हिडीओ, आवाज, बातम्या, कविता आणि 'सोशल मीडिया' पोस्ट तयार करता येतात. या क्षमतेने डिजिटल जगाला प्रचंड वेग दिला आहे; परंतु याचबरोबर इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कमी दर्जाच्या, पुनरावृत्ती असलेल्या किंवा केवळ लक्ष वेधण्यासाठी तयार केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेतील कंटेंटसाठी एक नवा शब्द लोकप्रिय झाला आहे, 'एआय स्लॉप'. 'स्लॉप' म्हणजे अक्षरशः कमी दर्जाचे किंवा अनावश्यक साहित्य.



एखाद्या विषयावर शेकडो जवळजवळ सारखे लेख तयार होणे, बनावट व्यक्तींचे फोटो, अवास्तव प्राण्यांचे व्हिडीओ, अतिरंजित बातम्यांची शीर्षके किंवा 'सोशल मीडिया'वर केवळ व्ह्यूज मिळवण्यासाठी तयार केलेले भावनिक कंटेंट हे त्याचे काही नमुने आहेत. 'एआय स्लॉप'मुळे खरा आणि खोटा कंटेंट यांच्यातील सीमारेषा अस्पष्ट होऊ शकते. आज एखाद्या लोकप्रतिनिधीचा, सेलिब्रिटीचा किंवा सामान्य व्यक्तीचा आवाज काही मिनिटांमध्ये हुबेहूब तयार करता येतो. एखाद्या घटनेचा वास्तवदर्शी वाटणारा व्हिडीओ तयार करता येतो. त्यामुळे भविष्यात 'हे खरे आहे का?' हा प्रश्न 'हे कोणी तयार केले?' इतकाच महत्त्वाचा ठरणार आहे. याचा परिणाम विद्यार्थ्यांपासून व्यावसायिकांपर्यंत सर्वांवर होतो. एखाद्या विषयावर संशोधन करताना इंटरनेटवर कृत्रिम बुद्धिमत्तानिर्मित मजकूर उपलब्ध असेल, तर त्यातील चुकीची माहिती पुन्हा कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रशिक्षणात किंवा पुढील कंटेंटमध्ये वापरली जाऊ शकते. म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेली चूक पुन्हा कृत्रिम बुद्धिमत्तेमार्फतच वाढू शकते.

कोणतीही माहिती लगेच पुढे पाठवण्याआधी तिचा स्रोत तपासणे, एकापेक्षा अधिक विश्वासार्ह स्रोत पाहणे, संदर्भ समजून घेणे आणि फोटो-व्हिडीओवर त्वरित विश्वास न ठेवणे आवश्यक आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्येही आता केवळ 'माहिती शोधण्याचे' शिक्षण पुरेसे राहणार नाही. विद्यार्थ्यांना माहितीची गुणवत्ता तपासणे, स्रोत ओळखणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तानिर्मित सामग्रीचे मूल्यमापन करणे शिकवावे लागेल.

स्मार्ट गॅजेट्स

चष्म्यातूनही करता येणार पेमेंट



आतापर्यंत दुकानात गेल्यावर 'यूपीआय' पेमेंट करण्यासाठी मोबाईल काढावा लागत होता. 'क्यूआर कोड स्कॅन' करून पेमेंट करावे लागत होते. आतापर्यंत ही टेक्नोलॉजी आपल्याला ॲडवान्स्ड वाटत होती; पण आता त्याहीपेक्षा 'जिओ'ने एक पाऊल पुढे टाकले आहे. 'रिलायन्स जिओ'ने असे काही चष्मे सादर केले आहेत, ज्यांच्या मदतीने आता पेमेंट करणे शक्य होणार आहे. एवढेच नाही, तर 'एआय'च्या मदतीने लोकांशी वेगवेगळ्या भाषेमध्ये बोलणे सहज शक्य होणार आहे.

'रिलायन्स जिओ'ने 'इंडिया मोबाईल काँग्रेस'मध्ये आपल्या 'एआय' स्मार्ट चष्म्यांची झलक दाखवली. त्याच चष्म्यांचे दोन प्रकार त्यांनी सादर केले. एका चष्म्यात कॅमेरा नसून, गाणी ऐकण्यासाठी स्पीकर असतील. तर, दुसऱ्या प्रकारात स्पीकरसोबतच कॅमेराही दिला जाणार आहे. हे चष्मे दिसायला सामान्य चष्म्यांसारखे असले, तरी त्यामध्ये 'एआय' टेक्नोलॉजीचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे आता गाणी ऐकणे, फोन करणे, व्हिडीओ रेकॉर्ड करणे त्यासोबतच पेमेंट करणेही शक्य होणार आहे. 'जिओ'च्या चष्म्यांमधील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे चष्म्याद्वारे केले जाणारे पेमेंट. या चष्म्याच्या कॅमेऱ्याच्या मदतीने दुकानातील 'क्यूआर कोड' स्कॅन करता येणार आहे. मग कमांड दिल्यावर पेमेंट करणेही शक्य होणार आहे. मात्र, पेमेंट करताना 'ऑथेंटिकेशन प्रोसेस', 'सिक्युरिटी सिस्टीम' आणि 'ट्रान्जॅक्शन लिमिट' याबाबत कोणतीही माहिती अद्याप शेअर केली गेली नाही आहे; पण भारतीय बाजारात हे पाऊल मोठे आणि महत्त्वाचे मानले जात आहे.

या स्मार्ट चष्म्यांमध्ये 'लाइव्ह ट्रान्सलेशन'ची सुविधाही असणार आहे. त्यामुळे दोन वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांना एकमेकांचे बोलणे समजून घेण्यास मदत होणार आहे. याशिवाय अनेक भारतीय भाषांचा आधार आणि 'एआय व्हॉइस असिस्टंट'ही मिळण्याची शक्यता आहे. 'जिओ'ने या स्मार्ट चष्म्यांची अधिकृत किंमत, बॅटरीची क्षमता आणि संपूर्ण माहिती अद्याप जाहीर केलेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार हे चष्मे वर्षाखेरीस लाँच होण्याची शक्यता आहे.

विचाराअंती करा आर्थिक नियोजन

अर्थमंत्र

आर्थिक नियोजनाचा विचार करताना अल्पकालीन असो वा दीर्घकालीन; सर्वप्रथम उद्दिष्टांची निश्चिती आवश्यक आहे. आर्थिक नियोजन ही खूप विचाराअंती आणि दीर्घ काळासाठी करण्याची गरज आहे. सद्य परिस्थितीचा विचार करता, निवृत्तीनंतरची तरतूद म्हणून दोन कोटी रुपयांचा निधी जास्त वाटतो; परंतु २० वर्षांनंतर येणाऱ्या परिस्थितीचा विचार करता ही रक्कम खूपच अपुरी पडत असल्याचे लक्षात येईल. आर्थिक नियोजन ही सहज सुचली म्हणून आणि अंदाजांवर आधारित करण्याची गोष्ट नाही. आर्थिक गणितांचा हिशेब मांडून आणि उद्दिष्टांची दिशा निश्चित करूनच आर्थिक नियोजन करण्याचा विचार करावा. मोठी उद्दिष्टे गाठण्यासाठी लहानसहान उद्दिष्टांपासून सुरुवात करणे कधीही उत्तम. उदाहरणार्थ, दरमहिना ३० हजार रुपयांची बचत केल्यास तीन वर्षांनी दहा लाख रुपये घराचे डाऊन पेमेंट म्हणूनही वापरता येऊ शकतात. प्रत्येकाने आपल्या ऐपतीनुसार दरमहा काही प्रमाणात बचत करण्याची सुरुवात करावी.



गुंतवणूक करण्यासाठी गरजेनुसार अथवा परिस्थितीनुसार उद्दिष्टांचा क्रम बदलला जातो. उदाहरणार्थ, कुटुंबासाठी आरोग्यविमा खरेदी करणे ही बाब एखादी कार घेण्यापेक्षा जास्त महत्त्वाची आहे. मुलांच्या शिक्षणाची तरतूद झाल्यानंतर पालकांनी प्राधान्याने आपल्या निवृत्तीची तरतूद करणे गरजेचे असते. कारण शिक्षणासाठी गरज पडेल, तेव्हा कर्जाची सोय उपलब्ध असते. निवृत्तीनंतरचे आयुष्य सुखात आणि समाधानात व्यतीत करण्यासाठी अजून तरी कर्जाची उपलब्धता नाही.

'थेंबे थेंबे तळे साचे' या म्हणीप्रमाणे अल्प प्रमाणात बचतीला सुरुवात केल्यास भविष्यात मोठी गुंतवणूक करणे सहज शक्य आहे. दरमहिना थोडी का होईना बचत करणे गरजेचे आहे. त्यामुळे भविष्यात अचानक आर्थिक अडचण निर्माण झाल्यास थोडासा का होईना हातभार लागू शकतो. सध्याच्या काळात गुंतवणूक अथवा बचत करताना चलनवाढीचा धोका लक्षात घेणे आवश्यकच ठरते. उदाहरणार्थ, तुमच्या मुलीच्या शिक्षणासाठी आजच्या घडीला १५ लाख रुपये खर्च येईल असे गृहीत धरूया. चलवाढीचा दर ८ टक्के धरल्यास, दहा वर्षांनी हाच खर्च ३२ लाखांच्या घरात पोहोचला असेल. त्यामुळे चलनवाढीचा विचार करताना भविष्यातील तरतूद कशी वाढेल हे पाहणे गरजेचे आहे. मुलांच्या शिक्षणासाठी ठराविक रक्कम जमवण्यासाठी तीन वर्षांहून कमी कालावधी हातात असेल, तर इक्विटीमध्ये गुंतवणूक करण्याऐवजी डेटमध्ये करणे कधीही श्रेयस्कर. त्यामुळे तुमच्या भांडवलाची सुरक्षितताही जपता येईल. डेटमध्ये करण्यात आलेल्या गुंतवणुकीवर साधारणतः ८ ते ९ टक्के दराने व्याजही मिळेल, मूळ गुंतवणूक सुरक्षितही राहील आणि गरजेच्या वेळी ठरावीक रक्कम हातीही येईल. तुम्ही भविष्याची तरतूद म्हणून २० ते २५ वर्षांसाठी गुंतवणूक करण्याचा विचार करीत असाल, तर इक्विटीवर आधारित म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करणे गरजेचे आहे. इक्विटीमध्ये गुंतवणूक केल्यास दीर्घकालीन आणि अधिक दराने परतावा मिळण्याची शक्यता असते.

फॅशनच्या या चुका टाळा

फॅशन पॅशन

'जेलर २' प्रदर्शित झाला असून, रजनीकांत यांच्या स्वॅगची पुन्हा एकदा जोरदार चर्चा सुरू आहे. दक्षिणेतील सुपरस्टार रजनीकांत नेहमी साध्या वेशभूषेत दिसतात, तरीही त्यांचा लूक आकर्षक आणि डॅशिंग असतो. प्रत्येकजण त्यांच्यासारखा दिसण्याचा प्रयत्न करतो आणि चाहते त्यांच्या स्टाइलचे अनुकरण करतात; परंतु रजनीकांतसारखा स्वॅग हवा असेल, तर काही फॅशनच्या चुका आवर्जून टाळा.



रजनीकांत यांना पांढऱ्या शर्टमध्ये पाहिल्यास त्यांच्या कपड्यांचे योग्य फिटिंग सहज लक्षात येते. चेहऱ्याच्या आकारानुसार चष्म्याची फ्रेम निवडणे महत्त्वाचे आहे. गोल चेहऱ्यावर कोन असलेल्या फ्रेम्स चांगल्या दिसतात, तर चौकोनी चेहऱ्यावर किंचित वक्र आकाराच्या फ्रेम्स अधिक शोभून दिसतात. रजनीकांत नेहमी आपल्या चेहऱ्याच्या आकाराला अनुरूप चष्मा निवडतात. त्यामुळे त्यांचा लूक अधिक स्टायलिश दिसतो.

तुम्ही ब्रँडेड कपडे घालत असाल; पण त्वचा कोरडी असेल, केस विस्कटलेले असतील किंवा दाढी व्यवस्थित ठेवलेली नसेल, तर संपूर्ण लूकचा प्रभाव कमी होऊ शकतो. रजनीकांत यांच्या 'सॉल्ट अँड पेपर' म्हणजेच पांढऱ्या आणि काळ्या केसांच्या लूकपासून प्रेरणा घेता येईल. पांढरे केस लपवणे आवश्यक नाही, तर ते व्यवस्थित आणि आकर्षक पद्धतीने सांभाळणे अधिक महत्त्वाचे आहे. एखाद्याची हुबेहूब नक्कल करणे प्रत्येक वेळी तुमच्यावर शोभून दिसेलच असे नाही. त्यामुळे स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला अनुरूप स्टाइल निवडा आणि ती आत्मविश्वासाने कॅरी करा.

फिरायला जायचा प्लॅन करताय?

भटकंती

मॉन्सूननंतर केरळमध्ये सर्वत्र हिरवळ पाहायला मिळते. डिसेंबर आणि जानेवारीच्या तुलनेत नोव्हेंबर महिन्यात गर्दी कमी दिसून येते. त्यामुळे केरळची ट्रिप आयुष्यभर लक्षात राहू शकते. मुन्नारला चहाचे मळे, थंड हवेचे ठिकाण असल्याने अनेकजण भेट देतात. जंगलात फिरायला आवडत असेल, तर तुम्ही थेक्कडी येथे भेट देऊ शकता. तसेच तुम्ही वाइल्डलाइफ सँक्च्युरीमध्ये बोट राइडचा आनंद घेऊ शकता. निसर्गात फिरण्याचाही आनंद घेता येईल. तसेच तुम्हाला जंगल परिसरात निरनिराळे पक्षी आणि प्राणी पाहायला मिळतील.



तुमच्यासाठी वायनाड बेस्ट राहील. तुम्हाला निसर्ग प्रिय असेल, तर वायनाडला नक्कीच भेट द्या. जंगल, झरा या भागांत ट्रेकिंगचा आनंद घेऊ शकता. हे ठिकाण केरळमध्ये खूपच प्रसिद्ध आहे. त्याचबरोबर अल्लेपीदेखील प्रसिद्ध ठिकाण आहे. ते शांत ठिकाण म्हणून ओळखले जाते. या भागात नारळाची अनेक झाडे आहेत. रस्त्याच्या आजूबाजूला अनेक झाडे असल्याने हवेत गारवा जाणवतो. तुम्ही समुद्रकिनारीदेखील जाऊ शकता.



वर्कला समुद्रकिनाऱ्यावर सनसेटचा आनंद घेऊ शकता. समुद्रकिनाऱ्यावर प्रचंड स्वच्छता पाहायला मिळते. तसेच या किनाऱ्यावर शांतता देखील जाणवते. त्यामुळे या किनाऱ्यावर पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. तुम्ही बोटिंगचीदेखील मजा घेऊ शकता. लहान मुलांच्या आवडीचा हा समुद्रकिनारा आहे.

बारावीनंतर थेट सैन्यात संधी

रोजगारसंधी

भारतीय सैन्यात अधिकारी होण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. भारतीय सैन्याने बारावी 'टेक्निकल एंट्री स्किम' भरतीसाठी अधिसूचना जारी केली आहे. या भरतीसाठी अर्ज शुल्क आकारले जाणार नाही. इच्छुक उमेदवारांना ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत.

या भरतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी बारावीच्या परीक्षेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयांसह किमान ६० टक्के गुण मिळवलेले असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने 'जेईई मेन' परीक्षा दिलेली असावी. तसेच भरतीसाठी केवळ अविवाहित पुरुष उमेदवार अर्ज करू शकतात. उमेदवारांचे वय १६ ते १९ वर्षांपर्यंत असणे आवश्यक आहे. या भरतीसाठी स्वतंत्र लेखी परीक्षा घेतली जाणार नाही. बारावीतील गुण आणि 'जेईई मेन'मधील कामगिरीच्या आधारे उमेदवारांची प्राथमिक निवड केली जाईल. त्यानंतर निवडलेल्या उमेदवारांना 'सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड' (एसएसबी) मुलाखतीसाठी बोलावले जाईल. मुलाखतीत यशस्वी झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी होईल. त्यानंतर गुणवत्ता यादी आणि निर्धारित निवड प्रक्रियेनुसार अंतिम निवड केली जाईल.



या योजनेअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना चार वर्षांचे प्रशिक्षण दिले जाईल. यामध्ये लष्करी प्रशिक्षणासोबतच अभियांत्रिकीचे शिक्षणही दिले जाणार आहे. प्रशिक्षणादरम्यान उमेदवारांना दरमहा ५६ हजार १०० रुपये विद्यावेतन मिळेल. अभ्यासक्रम पूर्ण करून निर्धारित अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना आभियांत्रिकी पदवी, लेफ्टनंट पदावरील नियुक्ती आणि कायमस्वरूपी कमिशनही मिळेल. नियुक्तीनंतर वेतनश्रेणीनुसार पगार आणि भत्ते दिले जातील. या पदासाठी वार्षिक पॅकेज सुमारे १७ ते १८ लाख रुपये देण्यात येणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी भारतीय सैन्याच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी. तेथे ऑफिसर ट्रेनिंग विभागातील टीईस-५७ भरतीची लिंक नोंदणी करावी. त्यानंतर लॉगिन करून वैयक्तिक माहिती, शैक्षणिक तपशील, बारावीतील गुण आणि जेईई मेन संदर्भातील माहिती भरावी.

स्वत:वर विश्वास हवा

वेगळ्या वाटा



सध्याच्या काळात बऱ्याच तरुणांना उद्योगविश्व खुणावत असतं. स्टार्ट अप्सना मिळणारं यश तरुणांना उद्योजक बनण्यासाठी प्रोत्साहित करत असतं. मात्र उद्योजक व्हायचं तर स्वत:वर विश्वास हवा. आत्म विश्वासाचा अभाव तुम्हाला पुढे घेऊन जाऊ शकत नाही. उद्योजक बनायचं तर स्वत:वर अविश्वास दाखवून कसं चालेल? यशस्वी उद्योजक बनण्यासाठी नेमकं काय करता येईल याविषयी...

* स्वत:वरचा अविश्वास एका टप्प्यानंतर दूर होईल, हा समज चुकीचा आहे. हा अविश्वास दूर करण्यासाठी तुम्हालाच प्रयत्न करायला हवेत. अविश्वास दाखवण्याची सवय नेहमीच टिकून रहाणार आहे. मात्र या सवयीकडे नकारात्मक दृष्टीने बघू नका. स्वत:वर अविश्वास दाखवण्याला सर्वसाधारण बाब समजा.

* मनात स्वत:विषयी संशय उत्पन्न झाला की आधी केलेली चांगली कामं, मिळवलेलं यश यांचा विचार करा. आजवर मिळालेल्या यशाची स्वत:ला आठवण करून देत रहा. तुम्ही बऱ्याच अशक्य गोष्टी केल्या असतील. या गोष्टी आठवत राहिल्याने तुमचा स्वत:वरचा अविश्वास दूर होईल.

* सकारात्मक वातावरणात रहा. असं वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करा.

५५७ वी श्री गुरू नानक देवजी जयंती

मानवतेला समानता, सेवा आणि बंधुभावाचा संदेश देणारे युगपुरुष

ना कोणी हिंदू, ना कोणी मुसलमान; सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. शीख धर्माचे संस्थापक,, समाजसुधारक आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देणारे प्रथम शीख गुरू श्री गुरू नानक देवजी यांची आज ५५७ वी जयंती अर्थात प्रकाश पर्व मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने साजरी होत आहे. कार्तिक पौर्णिमेच्या पवित्र दिवशी साजरा होणारा हा उत्सव केवळ शीख समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.

श्री गुरू नानक देवजी यांचा जन्म १४६९ मध्ये तत्कालीन पंजाबमधील राय भोई दी तलवंडी या गावात झाला. हे गाव आज पाकिस्तानातील ननकाना साहिब म्हणून ओळखले जाते. त्यांच्या वडिलांचे नाव मेहता कल्याण दास ऊर्फ मेहता कालू आणि आईचे नाव माता तृप्ता होते. त्यांच्या मोठ्या बहिणीचे नाव बेबे नानकी होते. बालपणापासूनच नानकजींची विचारशक्ती, आध्यात्मिक चिंतन आणि समाजातील रूढी-परंपरांबाबत प्रश्न विचारण्याची वृत्ती विलक्षण होती.

लहानपणापासूनच त्यांना गरीब, गरजू आणि उपेक्षितांविषयी विशेष कळवळा होता. त्यांच्या जीवनातील 'सच्चा सौदा' ही घटना आजही प्रत्येकाला प्रेरणा देते. वडिलांनी व्यवसाय करण्यासाठी त्यांना वीस रुपये दिले. मात्र, वाटेत काही भुकेल्या साधू-संतांना पाहून त्यांनी त्या पैशातून अन्न विकत घेतले आणि त्यांना भोजन दिले. घरी परतल्यावर वडिलांनी पैशांचे काय केले, असे विचारले असता त्यांनी सांगितले की, भुकेल्यांना अन्नदान करणे हाच खरा आणि सर्वश्रेष्ठ व्यापार आहे. या घटनेतूनच 'सच्चा सौदा' अर्थात खरा व्यवहार म्हणजे मानवसेवा, हा संदेश जगासमोर आला.

पुढे ते सुलतानपूर लोधी येथे नवाब दौलत खान लोधी यांच्या धान्य कोठारात काम करू लागले. तेथे धान्य मोजताना तेरा हा आकडा आल्यावर ते 'तेरा, तेरा' असे म्हणत असत. पंजाबी भाषेत 'तेरा' म्हणजे 'तुझे'. या शब्दातून सर्व काही परमेश्वराचे आहे आणि आपण केवळ त्याची सेवा करायची आहे, हा त्यांचा आध्यात्मिक भाव व्यक्त होत असे. याच काळात त्यांची भाई मरदाना यांच्याशी मैत्री झाली. भाई मरदाना हे कुशल रबाबवादक होते आणि त्यांनी गुरू नानक देवजींच्या अनेक आध्यात्मिक प्रवासांत त्यांची साथ दिली.



सुलतानपूर येथे बेईन नदीत स्नानासाठी गेले असताना गुरू नानक देवजींना दिव्य आध्यात्मिक अनुभूती प्राप्त झाली, असे शीख परंपरेत सांगितले जाते. त्यानंतर त्यांनी 'ना कोणी हिंदू, ना कोणी मुसलमान' हा मानवतेच्या एकतेचा संदेश दिला. त्यांचा अर्थ कोणत्याही धर्माचा अवमान करणे नव्हता, तर प्रत्येक मानव हा परमेश्वराच्या निर्मितीचा समान भाग आहे, ही जाणीव करून देणे हा होता.

गुरू नानक देवजींनी समाजातील जातिभेद, उच्च-नीचता, अंधश्रद्धा, कर्मकांड आणि धार्मिक भेदभावाला विरोध केला. त्यांनी संपूर्ण मानवजातीला तीन महान तत्त्वांचा संदेश दिला – 'नाम जपो, किरत करो आणि वंड छको'. म्हणजेच परमेश्वराचे स्मरण करा, प्रामाणिक कष्ट करून उपजीविका करा आणि आपल्या कमाईतील वाटा गरजूंसोबत वाटून घ्या. ही तीन तत्त्वे आजही शीख धर्माचा आणि मानवतावादी जीवनपद्धतीचा पाया आहेत.

आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी भारतासह विविध देशांमध्ये विस्तृत प्रवास केले. या प्रवासांना 'उदासियां' असे संबोधले जाते. या प्रवासात त्यांनी विविध धर्मांचे संत, विद्वान, फकीर आणि सामान्य नागरिक यांच्याशी संवाद साधला. धर्म, भाषा, जात किंवा पंथ यांपेक्षा माणुसकी श्रेष्ठ आहे, हे त्यांनी आपल्या आचरणातून सिद्ध केले.

त्यांच्या जीवनातील भाई लालो आणि मलिक भागो यांची घटनाही अत्यंत प्रसिद्ध आहे. एका बाजूला प्रामाणिक कष्ट करून उदरनिर्वाह करणारे गरीब सुतार भाई लालो आणि दुसऱ्या बाजूला श्रीमंती व सत्तेच्या जोरावर संपत्ती मिळवणारे मलिक भागो होते. गुरू नानक देवजींनी मलिक भागो यांच्या मेजवानीचे आमंत्रण नाकारून भाई लालो यांच्या घरी साधे भोजन स्वीकारले. या प्रसंगी त्यांनी दोघांच्या अन्नातील फरक दाखवून दिला. भाई लालो यांच्या प्रामाणिक कष्टातून मिळालेल्या अन्नात त्यांना दूध दिसले, तर शोषणातून मिळवलेल्या संपत्तीचे प्रतीक म्हणून मलिक भागो यांच्या अन्नात रक्त दिसल्याची कथा सांगितली जाते. यातून प्रामाणिक श्रम आणि न्याय्य कमाईचे महत्त्व त्यांनी जगाला पटवून दिले.

दीर्घ प्रवास आणि उपदेशकार्य पूर्ण केल्यानंतर गुरू नानक देवजी यांनी पंजाबमधील रावी नदीच्या काठावर करतारपूर येथे वास्तव्य केले. येथे त्यांनी शेती, नामस्मरण, कीर्तन आणि सामूहिक भोजनाची परंपरा रुजवली. याच ठिकाणी 'संगत' आणि 'पंगत' या समानतेच्या संकल्पनांना संस्थात्मक स्वरूप प्राप्त झाले. गुरुद्वारातील लंगर परंपरेत जात, धर्म, श्रीमंती किंवा सामाजिक प्रतिष्ठा यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वजण एकाच पंक्तीत बसून भोजन करतात. ही केवळ भोजनाची व्यवस्था नसून समानता, बंधुभाव आणि मानवसेवेचे जिवंत प्रतीक आहे.

गुरू नानक देवजींनी आपल्या पश्चात गुरुपदासाठी आपल्या पुत्रांऐवजी निष्ठावान शिष्य भाई लेहणा यांची निवड केली आणि त्यांना 'गुरू अंगद देवजी' हे नाव देऊन दुसरे गुरू म्हणून नियुक्त केले. यामधून त्यांनी वंशपरंपरेपेक्षा पात्रता, समर्पण, सेवा आणि आध्यात्मिक निष्ठा यांना अधिक महत्त्व दिले.

२२ सप्टेंबर १५३९ रोजी गुरू नानक देवजी ज्योतीज्योत समाविष्ट झाले. मात्र, त्यांनी दिलेला मानवतेचा संदेश आजही जगभरातील कोट्यवधी लोकांना मार्गदर्शन करीत आहे.

त्यांच्या शिकवणीतील 'सरबत दा भला' ही संकल्पना विशेष महत्त्वाची आहे. शीख धर्मातील अरदास प्रार्थनेचा शेवट 'नानक नाम चढदी कला, तेरे भाणे सरबत दा भला' या शब्दांनी होतो. याचा अर्थ परमेश्वराच्या नामस्मरणातून सर्वांचे कल्याण होवो, संपूर्ण मानवजातीचे भले होवो, असा आहे. ही प्रार्थना कोणत्याही एका समाजापुरती मर्यादित नसून संपूर्ण जगाच्या सुख, शांती आणि समृद्धीची कामना करणारी आहे.

आजच्या काळात जगभरात वाढत असलेला धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक संघर्ष पाहता गुरू नानक देवजींचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी, गरजूंना मदत आणि प्रत्येक माणसाला सन्मान देणे, हीच त्यांच्या विचारांची खरी शिकवण आहे.

'मानवसेवा हीच ईश्वरसेवा' या विचाराने प्रेरित होऊन आपण सर्वांनी त्यांच्या शिकवणीचे आचरण करणे, हीच त्यांच्या ५५७ व्या प्रकाश पर्वानिमित्त त्यांना खरी आदरांजली ठरेल.

सर्वांना ५५७ व्या श्री गुरू नानक देवजी जयंती अर्थात प्रकाश पर्वाच्या हार्दिक शुभेच्छा!

- हरजीत सिंग वधवा,
९४२३१६२७२७



गुरुवाणी - १२१
आत्म परीक्षण आवश्यक

चातुर्मासाचा मुख्य उद्देश परिस्थितीपेक्षा मनस्थितीचा आहे. साधू साध्वी या काळात प्रतिक्रमण करतात. आपल्या आत्म्याची अनुभूती ही मानवीय रहावी यासाठी हे प्रतिक्रमण आहे. कर्म सिद्धांत सांगतो, एखादी गाठ चार महिन्यांपेक्षा अधिक काळ राहिली तर मानवीय भावना राहत नाही. यासाठी चातुर्मासानंतर विहार केला जातो. मन, बुद्धी पेक्षा आत्मा मोठा आहे. मन शुध्द झाले तरी आत्मा शुद्ध होणे आवश्यक असते. तुमच्या अनुभूतीतून तुमचे भविष्य घडत असते. आपण बाहेर जे व्यक्त होतो, त्यातून समाजात तुमची प्रतिमा तयार होते. पण आत तुम्ही जे असता, त्यातून तुमची स्वतःची प्रतिमा दिसते. म्हणून स्वतःच स्वतः चे परीक्षण महत्वाचे असते. आतमध्ये चाळणी लावा आणि कचरा बाहेर काढा. गुरूदेव सांगायचे, कितीही काळजी घेतली तरी घरात कचरा होतोच, म्हणून रोज झाडू मारावाच लागतो. त्याच प्रमाणे मनाचेही असते, कचरा येतच राहणार, तो नियमित साफ केला पाहिजे. आज लोकाशाह जयंती आहे. त्या काळात जैन धर्मात कर्मकांड, अवडंबर वाढले होते. लोकांच्या मनात धारणा बनवण्यात आली की पूर्णतः संयम मार्ग अशक्य आहे. याकाळात लोकाशाहकडे आगमची प्रतिलिपी करण्याचे काम आले. त्याचे हस्ताक्षर खूप सुंदर होते. तो जसजसे वाचत गेला तसे त्याला कळले की, परमात्म्याने सांगितलेला धर्म वेगळा आहे, आजचा धर्म वेगळ्याच मार्गाने चालतोय. त्यांनी समाजात वैचारिक क्रांती केली. त्यांनी स्वतः दीक्षा नाही घेतली पण त्यांच्या प्रेरणेने अनेकांनी दीक्षा घेतली व संयमाचा मार्ग अवलंबला. लवजीऋषीजी महाराज यांनाही आगम आणि तत्कालीन धर्माचरण यातील फरक दिसला. त्यांनी गुरु आज्ञेने आगमनुसार धर्म साधना सुरु केली. मात्र यामुळे जनमत बिथरले. हे पाहून गुरुजीही त्रस्त झाले व त्यांनी त्याला कैदेत रवाना करण्याची व्यवस्था केली. पण काही काळाने त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात आली. ते महाराष्ट्रात बुर्हाणपूरला आले. तिथे ते एका रंगारीच्या घरी गोचरीला गेले. तिथे विरोधकांनी मुद्दाम रंगारीकडे खोटं बोलून विषारी लाडू देऊन तेच तपस्वींना पारण्यासाठी देण्यास सांगितले. लवजीऋषी महाराजांनी ते खाल्ले आणि त्यांनी संथारा घेतला. त्यांनी आपले शिष्य सोमजी ऋषी यांना परत माघारी पाठवले व पुढे सोमजी ऋषी यांनी जैन परंपरा पुढे चालवली. आज ज्यांची जयंती आहे ते आचार्य हेमचंद्रजी सुद्धा गुजरातचे होते. त्यांनी संपूर्ण गुजरातला जैन राज्य बनवले. महाराष्ट्रात जसा वारकरी संप्रदायाचा प्रभाव आहे, तसाच गुजरातमध्ये जैन संप्रदायाचा प्रभाव आहे.

- उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

पॅरा बेंच प्रेस स्पर्धेत अस्मिरोद्दीन सय्यद यांना सुवर्णपदक



नगर – पुणे येथील हिंजवडी मधील महात्मा फुले अपंग शिक्षण केंद्र येथे पाचव्या राज्यस्तरीय पॅरा ऑलिम्पिक बेंच प्रेस स्पर्धेत नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे खेळाडू अस्मिरोद्दीन सय्यद यांनी ८८ किलो वजनी गटात तब्बल १४१ किलो वजन उचलत सुवर्णपदक पटकावले. यामुळे अस्मिरोद्दीन सय्यद यांची मार्च महिन्यात होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्यस्तरावर सातत्याने आपले वर्चस्व सिद्ध करणाऱ्या अस्मिरोद्दीन यांनी पाच वेळा सुवर्णपदक पटकावत आपल्या मेहनतीची आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणाची प्रचिती दिली आहे.

या यशामागे नियमित सराव, शिस्तबद्ध व्यायाम, योग्य मार्गदर्शन आणि जिद्दीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यांना प्रशिक्षक विजय कनोजिया तसेच संघटनेचे चेअरमन विलास दवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल नेक्स्ट लेव्हल फिटनेसचे संचालक ओंकार गुर्रम, फिटनेसचे सदस्य रुपेश गायकवाड, यश मोरे, अभि पठाडे, सुमीत जाधव आणि संघर्ष घागरे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

तायक्वांदो खेळाच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना साकडे

नगर– महाराष्ट्र राज्यातील तायक्वांदो खेळाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्राताई अजित पवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

राज्यात सध्या १० लाखांहून अधिक खेळाडू नियमितपणे तायक्वांदोचा सराव करत आहेत. या खेळाडूंना अधिक सक्षम करण्यासाठी राज्यातील एका प्रमुख शहरात असोसिएशनला सर्व सुविधांनी युक्त स्वतंत्र एक्सलन्स सेंटर मंजूर करणे, शासनाच्या मिशन लक्ष्यवेध योजनेत तायक्वांदोचा समावेश करणे, राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आधुनिक साहित्यासह प्रशिक्षण केंद्रे सुरू करणे, महानगरपालिका व जिल्हा परिषद शाळांमध्ये नियमित प्रशिक्षण व मुलींसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा राबवणे, तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी निवड झालेल्या खेळाडूंना १०० टक्के आगाऊ आर्थिक सहाय्य व स्पोर्ट्स सायन्स सुविधा उपलब्ध करून देणे, अशा प्रमुख मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. पवार यांनी या मागण्यांबाबत सकारात्मक प्रतिसाद दर्शवला.



राज्यातील तायक्वांदो खेळाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

याप्रसंगी इंडिया तायक्वांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे महासचिव अमजदखान (गफ्फार) पठाण, कोषाध्यक्ष डॉ. प्रसाद कुलकर्णी, उपाध्यक्ष घनश्याम सानप, तुषार आवटे यांच्यासह रोहन बांगर, दत्ता कदम, सुमित खंडागळे, सुरेश जाधव, प्रणव निवंगुणे, ज्योती पगारे, डेव्हिड आणि यश बोभाटे, गणेश वंजारे, योगेश बिचितकर, सचिन मरकड आदी उपस्थित होते.

अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगवर गुलमोहर चॅलेंजर्सचे निर्विवाद वर्चस्व; टायब्रेकरमध्ये पटकाविले विजेतेपद! साईदीप भगत ठरला सर्वोत्तम खेळाडू

नगर – अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या पर्वावर गुलमोहर चॅलेंजर्स संघाने विजेतेपदाची मोहोर उमटविली. अंतिम सामन्यात एक्सलन्स अचिव्हर्स आणि गुलमोहर चॅलेंजर्स यांच्यात अटीतटीची लढत झाली. निर्धारित वेळेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक गोल केल्याने सामना बरोबरीत सुटला. त्यानंतर झालेल्या टायब्रेकरमध्ये अचूक गोल करत गुलमोहर चॅलेंजर्सने विजेतेपद पटकाविले. एक्सलन्स अचिव्हर्स संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.



नगर क्लबच्या मैदानावर नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील फुटबॉल खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या स्पर्धेत आठ संघांनी सहभाग घेतला होता. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेत सकाळपासून रात्री उशिरापर्यंत सामने रंगले.

साखळी पद्धतीने खेळविण्यात आलेल्या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत एक्सलन्स अचिव्हर्स आणि गुलमोहर चॅलेंजर्स या दोन संघांनी अंतिम फेरीत धडक मारली. रविवारी रात्री झालेल्या अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले. पहिल्या हाफमध्ये एक्सलन्स अचिव्हर्सकडून कबीर गोखलानी याने गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. मात्र, गुलमोहर चॅलेंजर्सकडून आयुष गुंड याने अचूक गोल करत सामन्यात बरोबरी साधली.

पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघांनी एकमेकांना कडवी टक्कर दिल्यानंतर दुसऱ्या हाफमध्येही विजयासाठी जोरदार प्रयत्न केले. दोन्ही संघांच्या खेळाडूंनी आक्रमक चाली रचत प्रतिस्पर्धी संघाच्या गोलपोस्टवर चढाया केल्या. मात्र, गोलरक्षकांनी उत्कृष्ट कामगिरी करत गोल होऊ दिले नाहीत. अखेर निर्धारित वेळ संपेपर्यंत सामन्याचा निकाल १-१ असा बरोबरीत राहिला. त्यामुळे विजेता निश्चित करण्यासाठी टायब्रेकरचा आधार घेण्यात आला. यामध्ये गुलमोहर चॅलेंजर्सच्या खेळाडूंनी अचूक गोल नोंदवत विजेतेपदावर नाव कोरले.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात नमोह फुटबॉल क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया यांच्या हस्ते विजेत्या गुलमोहर चॅलेंजर्स संघातील खेळाडूंना चषक, पदके आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सिटी एफसी पुणेचे शशांक कर्णिक व पुणे पायोनियरचे रेयान शहा यांच्यासह विविध संघांचे मालक व प्रतिनिधी, खेळाडू, प्रशिक्षक तसेच पालक उपस्थित होते. उपविजेता एक्सलन्स अचिव्हर्स संघातील खेळाडूंनाही सन्मानचिन्ह, पदके आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी नमिता फिरोदिया म्हणाल्या की, अहिल्यानगर शहरातून उत्कृष्ट फुटबॉलपटू घडविण्यासाठी नमोह फुटबॉल क्लब विशेष योगदान देत आहे. खेळाडूंना केवळ स्पर्धेपुरते मर्यादित न ठेवता त्यांचे क्रीडा क्षेत्रातील करिअर घडविण्याच्या उद्देशाने क्लब कार्यरत आहे. ही स्पर्धा केवळ शहर पातळीवरील आयोजन न राहता, त्यातून निवड होणाऱ्या गुणवंत खेळाडूंना पुण्यातील व्यावसायिक फुटबॉल संघांमध्ये खेळण्याची संधी मिळणार आहे. त्यांना अनुभवी प्रशिक्षकांकडून योग्य मार्गदर्शन आणि व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या स्पर्धेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पुण्यातील सिटी पुणे फुटबॉल क्लब आणि पुणे पायोनिअर्स फुटबॉल क्लबचे निवड समिती सदस्य उपस्थित होते. त्यांनी दोन दिवस खेळाडूंच्या खेळाचे, तांत्रिक कौशल्याचे, मैदानावरील चपळाईचे आणि कामगिरीचे निरीक्षण केले. या निरीक्षणातून उत्कृष्ट खेळाडूंची निवड केली जाणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना संबंधित क्लबच्या संघात स्थान मिळविण्याची तसेच व्यावसायिक फुटबॉल प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अहिल्यानगरमधील उदयोन्मुख फुटबॉलपटूंना शहराबाहेरील मोठ्या व्यासपीठावर गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.

स्पर्धेतील वैयक्तिक पुरस्कारांमध्येही खेळाडूंनी आपल्या कामगिरीची छाप उमटविली. बेस्ट गोलकिपर म्हणून दक्ष कुलकर्णी, बेस्ट डिफेंडर म्हणून सोहेल खान आणि टॉप स्कोअर म्हणून कबीर गोखलानी यांची निवड करण्यात आली. या तिन्ही खेळाडूंना चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेतील सर्वोच्च वैयक्तिक सन्मान असलेला 'बेस्ट प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्कार साईदीप भगत याला प्रदान करण्यात आला. त्याला चषक आणि प्रमाणपत्रासह शिवम सायकलच्या वतीने सायकल भेट देण्यात आली.

यंदाच्या स्पर्धेत एमडी अँड आरडीएक्स इन्फ्रा, गुलमोहर चॅलेंजर्स, गांधी वॉरियर्स, डायनामिक स्ट्रायकर, एक्सलन्स अचिव्हर्स, विद्यादान अल्फा एक्स, डॉक्टर बायो आणि नवा मराठा योद्धा या आठ संघांनी विजेतेपदासाठी सहभाग घेतला होता. या संघांचे मालक म्हणून ऋत्विक वाबळे, जोएब खान, चेतन गांधी, सिद्धार्थ मुनोत, आशिष टट्टू, रोहित रामदिन, सचिन सोलाट, ॲड. ललित गुंदेचा, अभिनंदन आणि रुही भन्साळी यांनी जबाबदारी सांभाळली.

स्पर्धेच्या आयोजनासाठी अभिनंदन आणि रुही भन्साळी (अबित्री मोशन) यांचे को-पॉवर म्हणून सहकार्य लाभले. राजेश भंडारी (महावीर ग्रुप) हे किट स्पॉन्सर, तर प्रणिल मुनोत (कॉनप्लेक्स) हे को-स्पॉन्सर होते. याशिवाय राम एजन्सी, शिवम सायकल, फन्की लॅण्ड, अमित ट्रेडर्स, जलाराम फुड्स आणि खेलोफाय यांचेही सहकार्य लाभले.

'राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत' नगरच्या देवदत्त गुंडू यांनी पटकावली सुवर्णपदके

नगर – दिल्ली येथे पार पडलेल्या डब्ल्यूआरपीएफ नॅशनल पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत अहिल्यानगरचे पॉवरलिफ्टिंगपटू देवदत्त प्रवीण गुंडू यांनी १२५ किलो वजन गटात सर्व प्रकारांत सुवर्णपदके पटकावली.



या राष्ट्रीय स्पर्धेत हरियाणा, पंजाब, दिल्ली, जम्मू-काश्मीर, महाराष्ट्र, हिमाचल प्रदेश, आसाम, गुजरात यांसह विविध राज्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. देशातील बलाढ्य खेळाडूंशी स्पर्धा करत देवदत्त यांनी सर्व प्रकारांत सुवर्णपदके मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले. देवदत्त यांच्या यशामागे कठोर सराव, शिस्त, सातत्य आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा असून, राष्ट्रीय स्तरावर मिळवलेल्या या यशामुळे युवा खेळाडूंना निश्चितच प्रेरणा मिळणार आहे.

या यशाबद्दल देवदत्त गुंडू यांनी डब्ल्यूआरपीएफ इंडियाचे अध्यक्ष सुनील लोचब, डब्ल्यूआरपीएफ महाराष्ट्र राज्य प्रमुख सौरभ चौधरी आणि डब्ल्यूआरपीएफ महाराष्ट्र राज्य उपप्रमुख शितल चौधरी यांचे मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. गुंडू यांची पॉवरलिफ्टिंग क्षेत्रातील आजवरची कामगिरीही उल्लेखनीय आहे. त्यामध्ये डब्ल्यूआरपीएफ आयर्न वर्ल्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२६, बँकॉक येथे सुवर्णपदके, डब्ल्यूआरपीएफ वेस्ट झोन पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२६, मुंबई येथे सुवर्णपदके, डब्ल्यूआरपीएफ वर्ल्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५, मॉस्को येथे रौप्यपदक, डब्ल्यूआरपीएफ नॅशनल पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५, दिल्ली येथे सुवर्णपदके, डब्ल्यूआरपीएफ एशियन पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये एक सुवर्ण व एक कांस्यपदक, तसेच डब्ल्यूआरपीएफ ओपन एशिया पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये एक रौप्य व दोन कांस्यपदकांचा समावेश आहे. याशिवाय डिस्ट्रिक्ट बेंच प्रेस स्पर्धेत सुवर्णपदक, ओपन रॉ स्टेट चॅम्पियनशिप पुणे येथे रौप्यपदक, इंडिया स्ट्राँगमन चॅम्पियनशिप गुजरातमध्ये दोन रौप्य व एक कांस्यपदक, ऑल इंडिया नॅशनल डेडलिफ्ट चॅम्पियनशिप मुंबई येथे सुवर्णपदक आणि डिस्ट्रिक्ट पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक मिळवून त्यांनी यशाची मालिका कायम ठेवली आहे.

वीजबिल भरण्याच्या वादातून मारहाण

नगर – वीजबिल भरण्यास सांगितल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून शेतकऱ्याला दगडाने मारहाण करून जखमी केल्याची घटना वाळकी (ता. नगर) येथील धनगर वस्तीवर घडली. याप्रकरणी नगर तालुका पोलिसांनी चौघांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. याबाबत नामदेव रोहिदास निमसे (वय ३८, रा. धनगरवस्ती, वाळकी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार शिवाजी पाटीलबा निमसे, प्रमोद शिवाजी निमसे, मीरा शिवाजी निमसे (तिघे रा. वाळकी) आणि योगिता योगेश संभळे (रा. हिवरेबाजार, ता. अहिल्यानगर) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास ही घटना घडली.

प्रशासकीय मनमानीविरोधात २५ नोव्हेंबरला जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर आंदोलन

कर्मचाऱ्यांना प्रशासकीय त्रास व असुरक्षिततेचा आरोप; खातेनिहाय चौकशा रद्द करा, संरक्षण देण्याची मागणी

नगर – जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील मागासवर्गीय तसेच इतर कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास आणि विविध प्रकारच्या प्रशासकीय अडचणींना सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब महासंघाला वारंवार प्राप्त होत आहेत. या तक्रारींवर संबंधित विभागाकडे पाठपुरावा करुनही कोणतीही सुधारणा किंवा कार्यवाही होत नसल्याचा आरोप महासंघाने केला आहे. या प्रशासकीय मनमानीविरोधात महासंघाने २५ नोव्हेंबर रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालया समोर तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती महासंघाचे राज्याध्यक्ष एन. एम. पवळे यांनी दिली.

कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या त्रासापासून संरक्षण देणे हे संबंधित कार्यालयप्रमुखांचे प्राथमिक कर्तव्य आहे. मात्र, कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याऐवजी जिल्हा उपनिबंधकांकडून त्यांच्याच विरोधात खातेनिहाय चौकशा लावणे, लेखी जबाब मागविणे आणि विविध प्रशासकीय प्रक्रियांद्वारे त्रास दिला जात असल्याचा आरोप महासंघाने केला आहे. या प्रकारामुळे कर्मचाऱ्यांना नियमित कार्यालयीन कामकाज करताना मानसिक तणावाला सामोरे जावे लागत असून, कार्यालयातील वातावरणही अस्वस्थ बनल्याचे महासंघाचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांनी बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या त्रासासंदर्भात पोलीस खात्याकडे लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. या तक्रारींची माहिती जिल्हा उपनिबंधकांना देण्यात आली असून, संबंधित कर्मचाऱ्यांना पोलीस संरक्षण मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली होती. यासंदर्भात जिल्हा उपनिबंधकांशी प्रत्यक्ष चर्चाही करण्यात आली होती. मात्र, या प्रकरणात अद्याप कोणतीही कार्यवाही झाल्याचे महासंघाला कळविण्यात आलेले नाही. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत असल्याचे पवळे यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर महासंघाने विविध मागण्या पुढे केल्या आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार विभागातील कर्मचाऱ्यांविरोधात नियमबाह्य पद्धतीने लावण्यात आलेल्या खातेनिहाय चौकशा तातडीने रद्द कराव्यात, कर्मचाऱ्यांविरोधात चुकीची माहिती देऊन किंवा तक्रार अर्जांच्या माध्यमातून त्यांना त्रास देण्याचे प्रकार त्वरित थांबवावेत, तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना पोलीस खात्यामार्फत आवश्यक संरक्षण मिळवून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सहाय्यक सहकारी अधिकारी डी. डी. पारधे आणि वरिष्ठ लिपिक श्रीमती ए. पी. खरपुडे यांनी २५ सप्टेंबर २०२६ रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या दाखल गुन्ह्याची योग्य चौकशी करून संबंधितांना न्याय मिळण्यासाठी आवश्यक कायदेशीर कार्यवाही व्हावी, यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे, अशीही महासंघाची मागणी आहे.

कर्मचाऱ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन प्रशासनाने तातडीने योग्य निर्णय घ्यावा आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, अशी भूमिका महासंघाने घेतली आहे. मात्र, मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाही न झाल्यास २५ नोव्हेंबर रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..

दिवाळी धमाका ऑफर

₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची)

+

₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)



11 सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी* (प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)

ऑफर कालावधी – 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध

चंदुकाका ज्वेल्स

शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

बुधवार चालु

Conditions Apply*

भाड्याने देणे

सक्कर चौक, स्टेशन रोड येथे
गाळा भाड्याने देणे
ट्रॅव्हल एजंट, कुरियर, पार्सल सेवा, ई-सेवा केंद्र, नाष्टा पॉईंटसाठी
9422411144

भाड्याने उपलब्ध

कॅप्टन राजाभाऊ कुलकर्णी मार्ग, जुना मंगळवार बाजार येथील मध्यवर्ती चौकात मोक्याचे लोकेशन उपलब्ध.
८०० चौ. फूट. तळमजल्यावरील गाळा व्यावसायिक / घरगुती वापरासाठी/ऑफिस, एजन्सी, क्लिनिक यांसाठी उपयुक्त
7770027505

भाड्याने देणे

शहराच्या मध्यवस्तीमध्ये सर्व सोयींनी युक्त
1BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे
पत्ता- 'कला सुगंध' ठाकूर गल्ली, तोफखाना, अहिल्यानगर
9403026565

पाहिजेत

नगर हॉटेलमध्ये बिलिंग काउंटरच्या कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा पाहिजे
9065186565

पाहिजेत

हॉस्पिटलसाठी
सिस्टर्स (जागा २) (ANM/GNM), (Day/Night)
मावशी (जागा २)
साकार हॉस्पिटल
पोलीस कॉलनी जवळ, वालिकाश्रम रोड, अ. नगर
9822294489

पाहिजेत

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी
त्वरित पाहिजेत
सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षांचा अनुभव
कॅशिअर-०४
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -
Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar
7887395983

पाहिजेत

सिस्टर -२
रिसेप्शनिस्ट-२
मावशी -१
वहाडणे हॉस्पिटल
0241-2430411
9881513443

पाहिजेत

घरकाम व स्वयंपाक साठी बाई पाहिजे.
कुटुंबासहित रहाण्याची एक रूम ची स्वतंत्र सोय.
पत्ता- जाधव मळा, सारडा कॉलेजच्या मागे, बालिका आश्रम रोड. अहिल्यानगर.
8080225436

गिरण विकणे आहे

पत्ता- नागरदेवळे
भाग्यश्री शेलार
7558258784
अनिता शेलार
9923709948

घर विकणे

योग्य किंमतीत
दुमजली घर विकणे
बालिकाश्रम रोड, जाधव मळा तुलसीपार्कसमोर, लक्ष्मीमाता मंदिराजवळ (एजंट क्षमस्व)
संपर्क ५ ते ८
9730292394

भाड्याने देणे

तपकीर गल्ली येथील
व्यावसायिक दोन गाळे
१२००×१२०० चे गाळे
भाड्याने देणे
7276732227

फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी व निर्व्यसनी कारागीर पाहिजेत

* कारागीर - ४
* हेल्पर - ६

प्रसन्न फॅब्रिकेटर्स
एल-५२,एमआयडीसी, अहिल्यानगर
9822499210
9657646555

पाहिजेत

जियो पेट्रोल पंपावर पेट्रोल व डिझेल भरण्यासाठी कामगार पाहिजे
गाडीमध्ये हवा भरण्यासाठी माणूस पाहिजे
संपर्क- जिओ पेट्रोल पंप, यश पॅलेस हॉटेल शेजारी, सक्कर, चौक, अहिल्यानगर
9552121569

पाहिजेत

नगर मधील प्रतिथयश बांधकाम कंपनीत त्वरित पाहिजे
साईट इंजिनिअर (M) जागा-२
बांधकाम क्षेत्रात काम केलेल्या अनुभवीस प्राधान्य
लेडिज अकाउंटंट कम रिसेप्शनिष्ट (F) जागा-२
कॉम्प्युटर टॅलीचे ज्ञान आणि इंग्रजी व मराठी टायपिंग आवश्यक
◆ आकर्षक पगार ◆ इतर सवलती
मुलाखतीचे वेळ : गुरुवार दि.२६ नोव्हेंबर २०२६, स. ११ ते ०२ पर्यंत
आदियाज प्रॉपर्टीज्
पत्ता : २०२, एस.जी.के. आयकॉन, दुसरा मजला, HDFC बँकेच्या वर, पाइपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर.
Mob : 91580 49777 Email : deepakbangar1981@gmail.com
Eye Q Media

Turn Data into Insights and Build a Smarter Future!

An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE

CERTIFICATE COURSE IN DATA ANALYST

100% JOB Assistance

MASTER INDUSTRY-RELEVANT TOOLS

EXCEL Data Analysis & Automation
POWER BI Interactive Dashboards
SQL Data Querying & Management
PYTHON Data Analysis & Scripting
TABLEAU Data Visualization



ENROLL NOW!

दिल्ली गेट शाखा 9371051769
जुने बस स्टँड शाखा 9371151769
पाईपलाईन शाखा 7447761769

अनुभवी मेकॅनिक पाहिजे

(जागा २)
• सर्व प्रकारच्या Motorcycles व Scooters च्या सर्व्हिसिंग व दुरुस्तीचा अनुभव आवश्यक
• BS6 वाहनांचा अनुभव आवश्यक
• Electric Vehicles (EV) च्या सर्व्हिसिंग व दुरुस्तीचे ज्ञान
• सर्व प्रकारच्या टू-व्हीलरची कामे करण्याचा अनुभव आवश्यक

-उपलब्ध सुविधा -
2 Hydraulic Ramps / Air Compressor / Battery Charger / Washing Machine

पत्ता : मनमाड रोड, यशवंत फोर्डसमोर, अ. नगर
9422081922

उत्तम प्रतिष्ठेच्या नोकरीची सुवर्ण व्यवसायामध्ये आपणांस संधी



कॅशिअर - 4 जागा
2 ते 3 वर्षाचा अनुभव आवश्यक

सेल्स रिप्रेझिन्टिव्ह - 8 जागा
मराठी, हिंदी भाषेवर प्रभुत्व, उत्तम संभाषण कौशल्य, सराफी पेढीत काम करण्याचा अनुभव किंवा विना अनुभवींना सुद्धा प्राधान्य.

हेल्पर - 6 जागा

स्थापना 1937 जोखडी, अहिल्यानगर
S.G.K. एस.जी.कायगांवकर JEWELLERS

वेळ : सायं 4-6 | बुधवार बंद
सावेडी 9511902345

टिप : मुख्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 20 ते २६ नोव्हेंबर 2026



SCREEN - 1
रामायण
09.00 AM 200/- (3D)
01.00 PM 250/- (3D)
05.00 PM 250/- (3D)
09.00 PM 250/- (3D)

SCREEN - 2
12.00 AM 200/- (2D)
09.30 PM 200/- (2D)



SCREEN - 2
ओम चॅप्टर-१
03.30 PM 150/-
06.30 PM 150/-

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001



महाविजय शुभेच्छा!



लोकप्रिय मा.खासदार
मा.डॉ.सुजयदादा विखे पाटील
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!



* शुभेच्छुक *
मा.श्री. मनोज (भाऊ) दुलम मा. नगरसेवक (सभागृह नेता) म.न.पा. अ.नगर
Manoj_Dulam Manoj_Dulam 9225 700007



चौथे पुण्यस्मरण

क्षणोक्षणी आमच्या मनी
तुझीच आहे आठवण,
हीच आमच्या जीवनातील
अनमोल अशी साठवण..

आपल्या पावन स्मृतिस भावपुर्ण श्रद्धांजली

कै. जय शशिकांत बिडकर
स्व. दि. २४/११/२०२२

* दुःखांकित *
चंद्रकांत मधुकर बीडकर (काका) शशीकांत मधुकर बीडकर (वडील)
राजेंद्र मधुकर बीडकर (काका) समर्थ चंद्रकांत बीडकर (भाऊ)
निखिल चंद्रकांत बीडकर (भाऊ) प्रसन्न शशीकांत बीडकर (भाऊ)
ओम राजेंद्र बीडकर (भाऊ)
समस्त बीडकर परिवार



स्वेटर्स,जॅकेट, जर्कीन, टोपी, उलन स्टोल,मफलर, सॉक्स,स्वग व
अजून बरेच काही आणि तेही रास्त दरात

थंडीचे कपडे...
जन्मलेल्या बाळापासून मोठ्या महिला व पुरुषांसाठी, मुला-मुलींसाठी...

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

दैनंदिन मुख्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : २० ते २६ नोव्हेंबर 2026
टिप : मुख्ही-शो च्या वेळा बदलु शकतात



SCREEN - 1
रामायण
09.00 AM 200/- (3D)
01.00 PM 250/- (3D)
05.00 PM 250/- (3D)
09.00 PM 250/- (3D)

SCREEN - 2
12.00 AM 200/- (2D)
09.00 PM 200/- (2D)

ओम चॅप्टर-१ SCREEN - 2 बंधू (मराठी)



09.00 PM 150/-
06.00 PM 150/-

आशा कॅन्टीन सुविधा अल्पल्प दरात उपलब्ध
स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

द्वितीय स्मृतिगंध



तुमचे चिंतन, तुमच्या स्मृति,
आम्हाला त्यांचा आधार...
आमच्या प्रत्येक आचार-विचारात
तुमच्या प्रेरणेचा अविष्कार..

स्व. फुलचंदजी पहाडे
स्व. दि. २४/११/२०२४
आपल्या स्मृतिस
विनम्र आदरांजली..!

• शोकाकुल •
श्रीमती बदामबाई पहाडे | रमणलाल बाकलीवाल
संजय पहाडे । विजय पहाडे प्रकाश, कमल, राजकुमार, राहुल
समस्त पहाडे व बाकलीवाल परिवार

।।दशक्रिया विधी।।

सुसंस्कार ... सुविचारांचा वारसा
आमच्या पाठीशी आहे...
स्मृती सुगंध आपल्याच आदर्शत्वाचा
आजही दरवळत आहे...

दशक्रिया विधी
गुरुवार दि. २६/११/२०२६ रोजी
सकाळी ८.०० वा. नागरदेवळे
अमरधाम येथे होईल

आपल्या पावन स्मृतीस
भावपूर्ण श्रद्धांजली

स्व.गं.भा. सुमन रोहिदास ताठे

प्रवचन सेवा- युवा किर्तनकार हभप ओंकार महाराज बाबर भिंगार, अहिल्यानगर

-दु:खांकित-
दिलीप विनायकराव ताठे
ताठे, शेलार व रासकर परिवार

डॉ.अद्वैत गिते



MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू
पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन

या तक्रारींवर सामाजिक जाणीवेतून मोफत सल्ला व शिबीर

* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

रायगेट सर्व आजारांच्या निदानासाठी अत्याधुनिक सुसज्जित मशिन- ऑटोन कंपनीचे EEG, NCV, EMG मशिन उपलब्ध.

अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे